# आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

---

## विभागांची रचना

---

### प्रकरण I

### प्रारंभिक


विभाग

1. लघु शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ.

2. व्याख्या.

प्रकरण II

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

3. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना.

4. राष्ट्रीय प्राधिकरणाच्या बैठका.

5. राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक.

6. राष्ट्रीय प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती.

7. राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे सल्लागार समितीची स्थापना.

8. राष्ट्रीय कार्यकारी समितीची स्थापना.

9. उप-समित्यांची स्थापना.

10. राष्ट्रीय कार्यकारी समितीचे अधिकार व कार्यपद्धती.

11. राष्ट्रीय आराखडा.

12. किमान साहाय्यासाठी मार्गदर्शक सूचना.

13. कर्ज परतफेड इ. मध्ये साहाय्य.

## प्रकरण III

## राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

14. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना.

15. राज्य प्राधिकरणाच्या बैठका.

16. राज्य प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक.

17. राज्य प्राधिकरणाद्वारे सल्लागार समितीची स्थापना.

18. राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती.

19. राज्य प्राधिकरणाद्वारे किमान साहाय्यासाठी मार्गदर्शक सूचना.

20. राज्य कार्यकारी समितीची स्थापना.

21. राज्य कार्यकारी समितीद्वारे उप-समित्यांची स्थापना.

22. राज्य कार्यकारी समितीची कार्यपद्धती.

23. राज्य आराखडा.

24. आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये राज्य कार्यकारी समितीचे अधिकार व कार्यपद्धती.

## प्रकरण IV

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

25. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना.

26. जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षांचे अधिकार.

27. बैठका.

28. सल्लागार समित्यांची आणि इतर समित्यांची स्थापना.

29. जिल्हा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक.

30. जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती.

31. जिल्हा आराखडा.

32. जिल्हास्तरावर वेगवेगळ्या प्राधिकरणांद्वारे आराखडा तयार करणे व त्यांची अंमलबजावणी.

33. जिल्हा प्राधिकरणाद्वारे अधिग्रहण.

34. कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीमध्ये जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती.

## प्रकरण V

## आपत्ती व्यवस्थापनासाठी सरकारद्वारे करावयाच्या उपाययोजना

35. केंद्र सरकारने करावयाच्या उपाययोजना.

36. भारत सरकारच्या मंत्रालयांच्या किंवा खात्यांच्या जबाबदाऱ्या.

37. भारत सरकारच्या मंत्रालयांचे किंवा खात्यांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे.

38. राज्य सरकारने करावयाच्या उपाययोजना.

39. राज्य सरकारच्या खात्यांच्या जबाबदाऱ्या.

40. राज्याच्या खात्यांचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा.

## प्रकरण VI

## स्थानिक प्राधिकरण

41. स्थानिक प्राधिकरणाची कार्यपद्धती.

## प्रकरण VII

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था

42. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था.

43. राष्ट्रीय संस्थेचे अधिकारी व इतर कर्मचारी.

## प्रकरण VIII

## राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल

44. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल.

45. नियंत्रण, मार्गदर्शन इ.

## प्रकरण IX

## वित्त, लेखा आणि लेखापरीक्षा

46. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी.

47. राष्ट्रीय आपत्ती शमन निधी.

48. राज्य सरकारद्वारे निधीची स्थापना.

49. मंत्रालये आणि खात्यांद्वारे निधी वाटप.

50. आपत्कालीन खरेदी व लेखा.

## प्रकरण X

## गुन्हे व दंड

51. अडथळा इ. साठी शिक्षा.

52. खोट्या दाव्यासाठी शिक्षा.

53. पैसे किंवा साहित्य इ. च्या गैरवापरासाठी शिक्षा.

54. खोट्या चेतावणीसाठी शिक्षा.

55. सरकारच्या खात्यांद्वारे गुन्हे.

56. कर्तव्यावर असणाऱ्या अधिकाऱ्याची असफलता किंवा या अधिनियमातील तरतुदींच्या उल्लंघनाकडे त्याचा कानाडोळा.

57. अधिग्रहणाबाबत कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास दंड.

58. कंपन्यांद्वारे गुन्हा.

59. खटल्यासाठी मागील मंजुरी.

60. गुन्ह्यांची दखल.

## प्रकरण XI

## इतर

61. भेदभावा विरोधात प्रतिषेध

62. केंद्र सरकारद्वारे निर्देश जारी करण्याचा अधिकार

63. बचाव कार्यासाठी अधिकार उपलब्ध करणे.

64. विशिष्ट परिस्थितीत नियम बनविणे किंवा त्यात सुधारणा करणे.

65. बचाव कार्यासाठी संसाधने, तरतुदी, वाहने इ. च्या अधिग्रहणाचा अधिकार

66. नुकसान भरपाईची रक्कम.

67. चेतावणी इत्यादींच्या संप्रेषणासाठी प्रसार माध्यमांना निर्देश.

68. निर्णयाच्या आदेशांचे अधिप्रमाणन.

69. अधिकार सुपूर्द करणे.

70. वार्षिक अहवाल.

71. कोर्टाच्या अधिकारक्षेत्राला प्रतिबंध करणे.

72. अधिलिखित प्रभावासाठी कायदा.

73. प्रामाणिकपणे केलेली कारवाई.

74. कायदेशीर प्रक्रियेपासून सुरक्षितता.

75. केंद्र सरकारचे नियम बनविण्याचे अधिकार.

76. विनियम बनविण्याचे अधिकार.

77. नियम आणि विनियम संसदेच्या सभागृहांसमोर ठेवणे.

78. राज्य सरकारचे नियम बनविण्याचे अधिकार.

79. अडचणींचे निवारण करण्याचे अधिकार.

# आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

## 2005 चा अधिनियम क्र. 53

[23 डिसेंबर, 2005]

आपत्तींचे प्रभावी व्यवस्थापन व त्या संबंधीत किंवा त्याच्या प्रासंगिक घटनांसाठी अधिनियम.

भारतीय प्रजासत्ताकाच्या छपन्नाव्या वर्षी संसदेद्वारे खालीलप्रमाणे हे अधिनियमित केले जावे:-

### प्रकरण I

### प्रारंभिक

**1. लघु शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ-** (1) या अधिनियमाला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 असे म्हटले जाऊ शकते.

(2) हा संपूर्ण भारतात लागू आहे.

(3) केंद्र सरकारच्या, राजपत्रात, अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या तारखेपासून[1] हा अंमलात येईल; आणि या अधिनियमाच्या वेगवेगळया तरतुदींसाठी आणि वेगवेगळया राज्यांसाठी वेगवेगळया तारखा* निश्तिच केल्या जाऊ शकतात, आणि कोणत्याही राज्याशी संबंधित या अधिनियमातील कोणत्याही तरतुदी प्रारंभ होण्यासंबंधीचा कोणत्याही निर्देशाचा असा अर्थ लावला जाईल की, तो त्या राज्यात त्या तरतुदी प्रारंभ करण्याच्या संदर्भात निर्देश आहे.

2. **व्याख्या** - या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(a) "प्रभावित क्षेत्र" म्हणजे देशाचे असे क्षेत्र किंवा भाग जो आपत्तीमुळे प्रभावित आहे;

(b) "क्षमता निर्माण" मध्ये खालीलप्रमाणे समाविष्ट आहे:-

*(i)* विद्यमान संसाधनांची व संपादन करण्यात येणाऱ्या किंवा तयार केल्या जाणाऱ्या संसाधनांची ओळख;

*(ii)* उप-कलम (i) अन्वये ओळखलेली संसाधने संपादन करणे किंवा तयार करणे;

*(iii)* आपत्तींच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी कर्मचाऱ्यांचे गठन आणि प्रशिक्षण आणि अशा प्रशिक्षणांचा समन्वय;

(c) "केंद्र सरकार" म्हणजे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशासकीय नियंत्रण असलेले भारत सरकारचे मंत्रालय किंवा खाते;

(d) "आपत्ती" म्हणजे कोणत्याही भागात अचानक आलेले संकट, दुर्घटना, आपत्ती किंवा गंभीर घटना, जी नैसर्गिक किंवा मानवनिर्मित कारणांमुळे उद्भवलेली असते किंवा अपघात किंवा निष्काळजीपणाने घडलेली असते, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी किंवा मानव हानी होते किंवा मालमत्तेचा विध्वंस व हानी होते किंवा पर्यावरणाचा ऱ्हास व हानी याला कारणीभूत होते आणि तिचे स्वरूप आणि व्याप्ती ही प्रभावित क्षेत्रातील समुदायाच्या हाताळण्याच्या क्षमतेच्या पलीकडे असते.

(e) “आपत्ती व्यवस्थापन” म्हणजे नियोजन, आयोजन, समन्वय आणि अंमलबजावणी उपाययोजनांची सतत आणि एकात्मिक प्रक्रिया आहे, जी खाली दिलेल्यासाठी आवश्यक किंवा उपयुक्त आहे-

(i) कोणत्याही संकट किंवा आपत्तीचा धोका रोखणे;

(ii) कोणत्याही आपत्तीचा किंवा त्याच्या तीव्रतेचा किंवा परिणामाचा धोका शमविणे किंवा कमी करणे;

(iii) क्षमता-निर्माण;

(iv) कोणत्याही आपत्तीला सामोरे जाण्यासाठी तयारी;

(v) कोणत्याही धोकादायक आपत्ती परिस्थितीस किंवा आपत्तीस त्वरित प्रतिसाद;

(vi) कोणत्याही आपत्तीच्या परिणामांच्या तीव्रतेचे किंवा विशालतेचे मूल्यांकन करणे;

---

1. 28 जुलै, 2006 (ss. 2, 3, 4, 5, 6, 8, 10, 75, 77, 79), अधिसूचना क्र. एस.ओ. 1216 (E), दिनांक 28 जुलै, 2006 द्वारे;
* 1 ऑगस्ट, 2007 [ss 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 38, 39, 40, 41, 48, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, s. 70, 71, 72, 73, 74, 78, 79 चे sub.sec (2)], अधिसूचना क्र. S.O. 722 (E), दिनांक 7 मे, 2007 द्वारे;
* 17 मार्च, 2008 (ss. 44, 45), अधिसूचना क्र. 517 (E), दिनांक 17 मार्च, 2008 द्वारे;
* 18 ऑक्टोबर, 2011 (s. 46), अधिसूचना क्र. S.O. 2397 (E), दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 द्वारे, भारताचे राजपत्र, असाधारण, Part II, Sec 3 (ii).

(vii) निर्वासन, बचाव आणि साहाय्य;

(viii) पुनर्वसन आणि पुनर्निर्माण;

(f) “जिल्हा प्राधिकरण” म्हणजे कलम 25 च्या उप-कलम (1) अन्वये घटित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण;

(g) “जिल्हा योजना” म्हणजे कलम 31 अन्वये जिल्ह्यासाठी तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा;

(h) “स्थानिक प्राधिकरण” मध्ये पंचायती राज संस्था, नगरपालिका, जिल्हा मंडळ, कॅन्टोन्मेंट बोर्ड, नगर नियोजन प्राधिकरण किंवा जिल्हा परिषद किंवा इतर नावाने ज्ञात कोणतीही अन्य संस्था किंवा प्राधिकरण, ज्यांना काही काळापुरते कायद्याद्वारे कोणत्याही निर्दिष्ट स्थानिक क्षेत्रात आवश्यक सेवा प्रदान करण्यासाठी नागरी सेवांच्या नियंत्रण आणि व्यवस्थापनासहित अधिकार निहित करण्यात आले आहेत;

(i) “शमन” म्हणजे आपत्ती किंवा धोकादायक आपत्तीच्या परिस्थितीचा धोका, प्रभाव किंवा त्यांचे परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने केलेल्या उपाययोजना;

(j) “राष्ट्रीय प्राधिकरण” म्हणजे कलम 3 च्या उप-कलम (1) अन्वये स्थापित राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण;

(k) “राष्ट्रीय कार्यकारी समिती” म्हणजे कलम 8 च्या उप-कलम (1) अन्वये घटित राष्ट्रीय प्राधिकरणाची कार्यकारी समिती;

(l) “राष्ट्रीय आराखडा” म्हणजे कलम 11 अन्वये संपूर्ण देशासाठी तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा.

(m) “सज्जता” म्हणजे धोकादायक आपत्तीची परिस्थिती किंवा आपत्ती आणि त्याच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याची स्थिती;

(n) “विहित” म्हणजे या अधिनियमाअंतर्गत बनविलेल्या नियमांद्वारे विहित.

(o) “पुनर्निर्माण” म्हणजे आपत्तीनंतर कोणत्याही मालमत्तेचे बांधकाम किंवा पुन:स्थापना;

(p) “संसाधन” मध्ये मनुष्यबळ, सेवा, साहित्य व तरतुदी समाविष्ट आहेत;

(q) “राज्य प्राधिकरण” म्हणजे कलम 14 च्या उप-कलम (1) अन्वये स्थापित राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि त्या कलमाच्या अन्वये घटित केंद्रशासित प्रदेशातील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा समावेश आहे;

(r) “राज्य कार्यकारी समिती” म्हणजे कलम 20 च्या उप -कलम (1) अन्वये घटित राज्य प्राधिकरणाची कार्यकारी समिती;

(s) “राज्य सरकार” म्हणजे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशासकीय नियंत्रण असलेले राज्य सरकारचे खाते आणि राष्ट्रपतींद्वारे घटनेच्या अनुच्छेद 239 अन्वये नियुक्त केलेल्या केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासकाचा समावेश आहे;

(t) “राज्य आराखडा” म्हणजे कलम 23 अन्वये संपूर्ण राज्यासाठी तयार केलेली आपत्ती व्यवस्थापनाची योजना.

## प्रकरण II

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**3. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना** – (1) अशा तारखेपासून लागू होईल जी केंद्र सरकार, राजपत्रात अधिसूचनेद्वारे, या करिता नियुक्त करेल, या अधिनियमाच्या उद्देशासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नावाने एक प्राधिकरणाची स्थापना केली जाईल.

(2) राष्ट्रीय प्राधिकरणात एक अध्यक्ष व केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणे इतर सदस्यांची संख्या नऊपेक्षा जास्त असणार नाही व जोपर्यंत नियमात अन्यथा तरतुद नसेपर्यंत, राष्ट्रीय प्राधिकरणात खालील व्यक्ती असतील :-

(a) भारताचे प्रधानमंत्री, हे राष्ट्रीय प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

(b) इतर सदस्य नऊपेक्षा जास्त नसतील व ते राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित केले जातील.

(3) राष्ट्रीय प्राधिकरणाचे अध्यक्ष उप-कलम (2) च्या खंड (b) अन्वये नामित सदस्यांपैकी एका सदस्याला राष्ट्रीय प्राधिकरणाचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकतात.

(4) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या सदस्यांचा कार्यकाळ व सेवा अटी विहित केल्याप्रमाणे असतील.

**4. राष्ट्रीय प्राधिकरणाच्या बैठका** – (1) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षांना ज्या वेळी व ज्या ठिकाणी योग्य वाटेल त्या वेळी राष्ट्रीय प्राधिकरणाची बैठक होईल.

(2) राष्ट्रीय प्राधिकरणाचे अध्यक्ष राष्ट्रीय प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्ष असतील.

(3) कोणत्याही कारणास्तव राष्ट्रीय प्राधिकरणाचे अध्यक्ष राष्ट्रीय प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहू न शकल्यास, राष्ट्रीय प्राधिकरणाचे उपाध्यक्ष बैठकीचे अध्यक्ष असतील.

**5. राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक -** राष्ट्रीय प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले अधिकारी, सल्लागार व कर्मचारी, केंद्र सरकार राष्ट्रीय प्राधिकरणाला पुरवेल.

**6. राष्ट्रीय प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती -** (1) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, आपत्तीला वेळेवर आणि प्रभावी प्रतिसाद मिळावा यासाठी आपत्ती व्यवस्थापनासाठी धोरणे, योजना आणि मार्गदर्शक सूचना तयार करण्याची जबाबदारी राष्ट्रीय प्राधिकरणाची असेल.

(2) उप-कलम (1) मध्ये समाविष्ट पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता राष्ट्रीय प्राधिकरण –

(a) आपत्ती व्यवस्थापनाबाबत धोरणे तयार करू शकेल;

(b) राष्ट्रीय आराखड्याला मान्यता देऊ शकेल;

(c) भारत सरकारची मंत्रालयांनी किंवा खात्यांनी राष्ट्रीय आराखड्यानुसार तयार केलेल्या आराखड्याला मान्यता देऊ शकेल;

(d) राज्य आराखडा तयार करत असताना राज्य प्राधिकरणाद्वारे अनुसरण केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल;

(e) भारत सरकारच्या वेगवेगळया मंत्रालयांद्वारे किंवा खात्यांद्वारे त्यांच्या विकास आराखड्यामध्ये आणि प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण किंवा त्याच्या प्रभावांच्या शमन उपायांच्या एकत्रीकरणाच्या उद्देशांसाठी वापरल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल;

(f) आपत्ती व्यवस्थापनासाठी धोरणे व योजनेची अंमलबजावणी व कार्यान्वयन यांचा समन्वय करू शकेल;

(g) शमनाच्या उद्देशाने निधीची तरतूद करण्याची शिफारस करू शकेल;

(h) केंद्र सरकारद्वारे निश्चित केलेल्या मोठ्या आपत्तीने प्रभावित इतर देशांना अशा प्रकारची मदत उपलब्ध करू शकेल;

(i) आपत्ती निवारण, किंवा शमन, किंवा धोकादायक आपत्तीची परिस्थिती किंवा आपत्ती निवारणासाठी सज्जता व क्षमता वाढविण्यासाठी असे इतर उपाय करू शकेल, जे ते आवश्यक समजेल;

(j) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या कामकाजासाठी व्यापक धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वे ठरवू शकेल.

(3) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षांना, आपत्कालीन परिस्थितीत, राष्ट्रीय प्राधिकरणाचे सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार असेल परंतु अशा अधिकारांचा वापर राष्ट्रीय प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून असेल.

**(7) राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे सल्लागार समितीची स्थापना** – (1) राष्ट्रीय प्राधिकरण, आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध बाबींवर शिफारसी करण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ व राष्ट्रीय, राज्य किंवा जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापनामध्ये व्यावहारिक अनुभव असणाऱ्या एका सल्लागार समितीची स्थापना करू शकेल.

(2) सल्लागार समितीच्या सदस्यांना, केंद्र सरकारद्वारे राष्ट्रीय प्राधिकरणाशी सल्लामसलत करून विहित केलेले भत्ते दिले जातील.

**8. राष्ट्रीय कार्यकारी समितीची स्थापना-** (1) केंद्र सरकार कलम 3 च्या उप-कलम (1) अन्वये, अधिसूचना जारी झाल्यानंतर त्वरित या कलमान्वये राष्ट्रीय प्राधिकरणाला यै अधिनियमांतर्गतची कार्ये करण्यास साहाय्य करण्यासाठी एक राष्ट्रीय कार्यकारी समिती स्थापन करेल.

(2) राष्ट्रीय कार्यकारी समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल, ते म्हणजे:-

(a) भारत सरकारचा असा सचिव जो केंद्र सरकारच्या अशा मंत्रालयाचा किंवा खात्याचा प्रभारी आहे, ज्याचे आपत्ती व्यवस्थापनावर प्रशासकीय नियंत्रण आहे, जो अध्यक्ष होईल, *पदसिद्ध*;

(b) भारत सरकारचा असे सचिव, जे भारत सरकारच्या अशा मंत्रालयांचे किंवा खात्यांचे सचिव आहेत, ज्यांचा कृषी, अणु उर्जा, संरक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पर्यावरण व वन, वित्त (व्यय), आरोग्य, वीज, ग्रामीण विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, अंतरिक्ष, दूरसंचार, नगरविकास, जलसंपदा यावर प्रशासकीय नियंत्रण आहे आणि चिफ ऑफ स्टाफ कमिटीचे चिफ ऑफ इंटिग्रेटेड डिफेन्स स्टाफ आहेत, *पदसिद्ध*;

(3) राष्ट्रीय कार्यकारी समितीचे अध्यक्ष राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्यासाठी केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याला आमंत्रित करु शकेल आणि अशा अधिकारांचा उपयोग करू शकेल आणि अशी कार्ये पार पाडू शकेल जी केंद्र सरकारद्वारे राष्ट्रीय प्राधिकरणाशी सल्लामसलत करून विहित केलेली असतील.

(4) राष्ट्रीय कार्यकारी समितीद्वारे आपल्या अधिकाराचा वापर व कार्ये पार पाडण्यासाठीची प्रक्रिया केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणे असेल.

**(9) उप-समित्यांची स्थापना-** (1) राष्ट्रीय कार्यकारी समिती आपली कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक उप-समित्यांची स्थापना करू शकेल.

(2) राष्ट्रीय कार्यकारी समिती, त्यांच्या सदस्यांपैकी कोणालाही, उप-कलम (1) मध्ये संदर्भित, उप-समितीचा अध्यक्ष नियुक्त करेल.

(3) कोणत्याही उप-समितीशी संबंधित तज्ज्ञ म्हणून संबंधित कोणत्याही व्यक्तीस, केंद्र सरकारद्वारे विहित केल्याप्रमाणे भत्ते दिले जाऊ शकतात.

**10. राष्ट्रीय कार्यकारी समितीचे अधिकार व कार्यपद्धती –** (1) राष्ट्रीय कार्यकारी समिती, राष्ट्रीय प्राधिकरणाला त्यांच्या कामकाजासाठी साहाय्य करेल आणि राष्ट्रीय प्राधिकरणाची धोरणे आणि योजनेच्या अंमलबजावणीला जबाबदार असेल आणि देशातील आपत्ती व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी केंद्र सरकारने जारी केलेल्या निर्देशांचे पालन केल्याचे सुनिश्चित करेल.

(2) उप-कलम (1) मध्ये समाविष्ट पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता राष्ट्रीय कार्यकारी समिती –

(a) आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वयक आणि निरीक्षण संस्था म्हणून काम करू शकेल;

(b) राष्ट्रीय आराखडा तयार करू शकेल ज्याला राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे मान्यता मिळेल ;

(c) राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीशी समन्वय साधू शकेल व त्यावर निरीक्षण ठेऊ शकेल;

(d) भारत सरकारची विविध मंत्रालये किंवा खाती आणि राज्य प्राधिकरणांसाठी आपत्ती व्यवस्थापनांना आराखडा तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करू शकेल;

(e) राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकार आणि राज्य प्राधिकरणांना आवश्यक तांत्रिक सहाय्य प्रदान करू शकेल;

(f) भारत सरकारच्या खात्यांनी किंवा मंत्रालयांनी तयार केलेल्या राष्ट्रीय आराखड्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(g) मंत्रालये किंवा खात्यांद्वारे त्यांच्या विकास आराखड्यात व प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण आणि शमनासाठीच्या उपाययोजनांच्या एकत्रीकरणासाठी राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(h) सरकारची वेगवेगळी मंत्रालये किंवा खाती व संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या शमन आणि सज्जतेच्या उपाययोजनासंबंधी निरीक्षण करू शकेल, समन्वय साधू शकेल व निर्देश देऊ शकेल;

(i) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने सर्व सरकारी पातळीवरील सज्जतेचे मूल्यांकन करू शकेल, आणि आवश्यक असेल तेथे अशी सज्जता वाढविण्यासाठी निर्देश देऊ शकेल;

(j) विविध स्तरांवरील अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवी बचाव कर्मचाऱ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनासंबंधी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम योजना तयार करू शकेल व समन्वय साधू शकेल;

(k) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीची घटना घडल्यास त्याला समन्वयित प्रतिसाद देऊ शकेल;

(l) भारत सरकारच्या संबंधित मंत्रालयांना किंवा खात्यांना, राज्य सरकारांना व राज्य प्राधिकरणांना, त्यांच्याद्वारे कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांसंबंधी मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल किंवा निर्देश देऊ शकेल;

(m) सरकारच्या कोणत्याही खात्याकडून किंवा संस्थेकडून राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरणाला अशी मानवी किंवा भौतिक संसाधने, जी आपत्कालीन प्रतिसाद, बचाव आणि साहाय्य या उद्देशासाठी त्यांच्याकडे उपलब्ध आहेत, ती उपलब्ध करण्याची अपेक्षा करू शकेल;

(n) आपत्ती व्यवस्थापनात गुंतलेल्या भारत सरकारच्या मंत्रालयांना किंवा खात्यांना, राज्य प्राधिकरणांना, वैधानिक संस्थाना इतर सरकारी किंवा स्वयंसेवी संस्थाना व इतरांना सल्ला देऊ शकेल, सहायता करू शकेल व त्यांच्या कार्याचे समन्वय करू शकेल;

(o) राज्य प्राधिकरणांना व जिल्हा प्राधिकरणांना या अधिनियमाच्या अन्वये त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक तांत्रिक साहाय्य प्रदान करू शकेल किंवा त्यांना सल्ला देऊ शकेल;

(p) आपत्ती व्यवस्थापनासंबंधी सामान्य शिक्षण आणि जागरुकतेचा प्रसार करू शकेल; आणि

(q) अशी इतर कार्ये करू शकेल, जी राष्ट्रीय प्राधिकरण त्यांनी करण्याची अपेक्षा करेल.

**11. राष्ट्रीय आराखडा-** (1) संपूर्ण देशासाठी आपत्ती व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय आराखडा नावाची एक योजना तयार केली जाईल.

(2) राष्ट्रीय कार्यकारी समितीद्वारे राष्ट्रीय धोरणासंदर्भात आणि राज्य सरकार व आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ संस्था किंवा संस्थाच्या सल्लामसलतीने राष्ट्रीय आराखडा तयार केला जाईल, ज्याला राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे मान्यता दिली जाईल.

(3) राष्ट्रीय आराखड्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल-

(a) आपत्ती निवारणासाठी किंवा त्याचे परिणाम कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना;

(b) विकास आराखड्यांमध्ये शमन उपायांच्या एकीकरणासाठी करावयाच्या उपाययोजना;

(c) कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी सज्जता आणि क्षमता निर्माणासाठी करावयाच्या उपाययोजना;

(d) खंड (a), खंड (b) आणि खंड (c) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांच्या संदर्भात भारत सरकारच्या विविध मंत्रालयांच्या किंवा खात्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या.

(4) राष्ट्रीय आराखड्याचे वार्षिक पुनरावलोकन  केले जाईल व तो अद्ययावत केला जाईल.

(5) केंद्र सरकारद्वारे राष्ट्रीय आराखड्या अंतर्गत करावयाच्या उपाययोजनांना अर्थसहाय्य देण्यासाठी योग्य त्या तरतुदी करण्यात येतील.

(6) उप-कलम (2) आणि (4) मध्ये संदर्भित, राष्ट्रीय आराखड्याच्या प्रती भारत सरकारच्या मंत्रालयांना किंवा खात्यांना उपलब्ध केल्या जातील आणि अशी मंत्रालये किंवा खाती राष्ट्रीय आराखड्यानुसार स्वत: चा आराखडा तयार करतील.

**12. किमान साहाय्यासाठी मार्गदर्शक सूचना -** राष्ट्रीय प्राधिकरण, आपत्तीमुळे पीडित व्यक्तींना देण्यात येणाऱ्या किमान साहाय्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांची शिफारस करेल, ज्यामध्ये खालीलप्रमाणे असेल, -

(i) मदत शिबिरात निवारा, भोजन, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा व स्वच्छता यासंबंधित पुरविल्या जाणाऱ्या किमान गरजा;

(ii) विधवा आणि अनाथांसाठी केल्या जाणाऱ्या विशेष तरतुदी;

(iii) जीवितहानी झाल्यास तसेच घरांचे नुकसान झाल्यास व उपजीविकेच्या पुन:उभारणीसाठी सानुग्रह साहाय्य;

(iv) आवश्यक आहे असे इतर साहाय्य;

**13. कर्ज परतफेड इ. मध्ये साहाय्य –** राष्ट्रीय प्राधिकरण, मोठ्या आपत्तींच्या बाबतीत, आपत्तीग्रस्त व्यक्तींना कर्जाची परतफेड करण्यास साहाय्य किंवा अशा सवलतीच्या अटींवर ज्या योग्य आहेत, नवीन कर्ज देण्यासाठी शिफारस करू शकते.

## प्रकरण III

## राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**14. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना -** (1) प्रत्येक राज्य सरकार, कलम 3 च्या उपकलम (1) अन्वये अधिसूचना जारी झाल्यानंतर लवकरात लवकर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, राज्यासाठी अशा नावे, जे राज्य सरकारच्या अधिसूचनेमध्ये निर्दिष्ट केलेले असेल, एका राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करेल.

(2) राज्य प्राधिकरणात एक अध्यक्ष व इतर सदस्यांची संख्या राज्य सरकारने विहित केल्याप्रमाणे नऊपेक्षा जास्त असणार नाही व जोपर्यंत नियमात अन्यथा तरतूद नसेपर्यंत, राज्य प्राधिकरणात खालील सदस्यांचा समावेश असेल, ते म्हणजे:-

(a) राज्याचे मुख्यमंत्री, हे अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

(b) इतर सदस्य, आठ जणांपेक्षा जास्त असणार नाही, व ते राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित केले जातील.

(c) राज्य कार्यकारी समितीचे अध्यक्ष, *पदसिद्ध*.

(3) राज्य प्राधिकरणाचे अध्यक्ष उप-कलम (2) च्या खंड (b) अन्वये नामनिर्देशित सदस्यांपैकी एका सदस्याला राज्य प्राधिकरणाचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकतात.

(4) राज्य कार्यकारी समितीचे अध्यक्ष राज्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील, *पदसिद्ध*.

परंतु अशा केंद्रशासित प्रदेशाच्या बाबतीत, दिल्ली केंद्रशासित प्रदेश वगळता, ज्यांची विधानसभा आहे, मुख्यमंत्री या कलमांतर्गत स्थापित प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील आणि

इतर केंद्रशासित प्रदेशांच्या बाबतीत नायब राज्यपाल किंवा प्रशासक त्या प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील:

परंतु याशिवाय दिल्ली केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल हे अध्यक्ष असतील व त्याचे मुख्यमंत्री राज्य प्राधिकरणाचे उपाध्यक्ष असतील.

(5) राज्य प्राधिकरणाच्या सदस्यांचा कार्यकाळ व सेवा अटी विहित केल्याप्रमाणे असतील.

**15. राज्य प्राधिकरणाच्या बैठका** – (1) राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षांना ज्या वेळी व ज्या ठिकाणी योग्य वाटेल त्या वेळी राज्य प्राधिकरणाची बैठक होईल.

(2) राज्य प्राधिकरणाचे अध्यक्ष राज्य प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्ष असतील.

(3) कोणत्याही कारणास्तव राज्य प्राधिकरणाचे अध्यक्ष राज्य प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहू न शकल्यास, राज्य प्राधिकरणाचे उपाध्यक्ष बैठकीचे अध्यक्ष असतील.

**16. राज्य प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक** - राज्य प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले अधिकारी, सल्लागार व कर्मचारी, राज्य सरकार राज्य प्राधिकरणाला पुरवेल.

**17. राज्य प्राधिकरणाद्वारे सल्लागार समितीची स्थापना** - (1) राज्य प्राधिकरण, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध बाबींवर शिफारसी करण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापनाचा व्यावहारिक अनुभव असलेल्या, आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली एक सल्लागार समिती घटित करू शकेल.

(2) सल्लागार समितीच्या सदस्यांना असे भत्ते दिले जातील, जे राज्य सरकारद्वारे विहित केलेले असतील.

**18. राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती -** राज्य प्राधिकरण, या अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहता, राज्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी धोरणे आणि योजना ठरविण्यासाठी जबाबदार असेल.

(2) उप-कलम (1) मध्ये समाविष्ट पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता राज्य प्राधिकरण –

(a) राज्य आपत्ती व्यवस्थापन धोरण ठरवू शकेल;

(b) राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरवलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य आराखड्याला मान्यता देऊ शकेल;

(c) राज्य सरकारच्या खात्यांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याला मान्यता देऊ शकेल;

(d) राज्य सरकारच्या खात्यांद्वारे त्यांच्या विकास योजनांमध्ये आणि प्रकल्पांमध्ये आपत्तीचे निवारण किंवा त्याचे शमनाच्या उपाययोजनांच्या एकीकरणाच्या उद्देशाने मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल व त्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य प्रदान करू शकेल;

(e) राज्य आराखड्याच्या अंमलबजावणीत समन्वय साधू शकेल;

(f) शमन आणि सज्जतेच्या उपाययोजनांसाठी निधीच्या तरतुदीची शिफारस करू शकेल;

(g) राज्याच्या विविध खात्यांच्या विकास योजनांचे पुनरावलोकन करू शकेल व निवारण व शमन उपाययोजना त्यामध्ये एकीकृत केले गेले आहेत, हे सुनिश्चित करू शकेल;

(h) राज्य सरकारच्या खात्यांद्वारे शमन, क्षमता निर्माण आणि सज्जतेसाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचे पुनरावलोकन करू शकेल व ज्या आवश्यक आहेत त्या मार्गदर्शक सूचना जारी करू शकेल.

(3) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षांना, आपत्कालीन परिस्थितीत, राज्य प्राधिकरणाचे सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार असेल, परंतु अशा अधिकारांचा वापर राज्य प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून असेल.

**19. राज्य प्राधिकरणाद्वारे किमान साहाय्यासाठी मार्गदर्शक सूचना** - राज्य प्राधिकरण, राज्यात आपत्तीमुळे पीडित व्यक्तींना देण्यात येणाऱ्या किमान साहाय्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना तयार करेलः

परंतु अशी मानके, कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे या संदर्भात ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील किमान मानकांपेक्षा कमी असणार नाहीत.

**20. राज्य कार्यकारी समितीची स्थापना** – (1) राज्य सरकार, कलम 14 च्या उप-कलम (1) अन्वये अधिसूचना जारी झाल्यानंतर लगेचच, या अधिनियमानुसार राज्य प्राधिकरणाद्वारे, ठरवलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्य प्राधिकरणाला त्यांच्या कार्यामध्ये मदत करण्यासाठी व कार्याचे समन्वय करण्यासाठी व राज्य सरकारने जारी केलेल्या निर्देशांचे पालन केल्याचे सुनिश्चित करण्यासाठी एका राज्य कार्यकारी समितीची स्थापना करेल.

(2) राज्य कार्यकारी समितीमध्ये पुढील सदस्य असतील, ते म्हणजे:-

(a) राज्य सरकारचे मुख्य सचिव, हे अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

(b) राज्य सरकारच्या अशा खात्यांचे चार सचिव जे राज्य सरकारला योग्य समजेल,

*पदसिद्ध.*

(3) राज्य कार्यकारिणी समितीचे अध्यक्ष अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कार्ये पार पाडतील जी राज्य सरकारने विहित केलेली असेल आणि अशा इतर अधिकारांचा वापर करतील व कार्ये पार पाडतील जी त्यांना राज्य प्राधिकरणाने सोपविलेली असतील.

(4) राज्य कार्यकारी समितीद्वारे आपल्या अधिकारांचा वापर व आपली कार्ये पार पाडण्यासाठीची प्रक्रिया ती असेल जी राज्य सरकारद्वारे विहित केलेली असेल.

**21. राज्य कार्यकारी समितीद्वारे उप-समित्यांची स्थापना -** (1) राज्य कार्यकारी समिती आपली कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार, एक किंवा अधिक उप-समित्यांची स्थापना करू शकते.

(2) राज्य कार्यकारी समिती, आपल्या सदस्यांपैकी कोणालाही, उप-कलम (1) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे उप-समितीचा अध्यक्ष नियुक्त करू शकेल.

(3) कोणत्याही उप-समितीशी संबंधित तज्ज्ञ म्हणून संबंधित कोणत्याही व्यक्तीस राज्य सरकारद्वारे विहित केल्याप्रमाणे भत्ते दिले जाऊ शकतात.

**22. राज्य कार्यकारी समितीची कार्यपद्धती –** (1) राज्य कार्यकारी समिती राष्ट्रीय आराखडा व राज्य आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असेल आणि राज्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वय आणि देखरेख संस्था म्हणून कार्य करेल.

(2) उप-कलम (1) च्या पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता राज्य कार्यकारी समिती –

(a) राष्ट्रीय धोरण, राष्ट्रीय आराखडा आणि राज्य आराखडा यांच्या अंमलबजावणीचे समन्वय व देखरेख करू शकेल;

(b) राज्यातील वेगवेगळया भागात आपत्तींच्या विविध प्रकारांच्या परिणामांचे परीक्षण करू शकेल व त्यांच्या निवारणासाठी किंवा शमनासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना निर्दिष्ट करू शकेल;

(c) राज्य सरकारची मंत्रालये आणि जिल्हा प्राधिकरणांद्वारे आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल;

(d) राज्य सरकारच्या मंत्रालयांनी आणि जिल्हा प्राधिकरणाद्वारे तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(e) खात्यांद्वारे त्यांच्या विकास आराखड्यात व प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण आणि शमन उपाययोजनांच्या एकीकरणासाठी राज्य प्राधिकरणाद्वारे ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(f) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने सर्व सरकारी किंवा बिगर-सरकारी पातळीवरील सज्जतेचे मूल्यांकन करू शकेल, आणि जेथे आवश्यक आहे तेथे अशी सज्जता वाढविण्यासाठी निर्देश देऊ शकेल;

(g) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्ती उद्भवल्यास त्याला समन्वयित प्रतिसाद देऊ शकेल;

(h) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांसंदर्भात राज्य सरकारच्या कोणत्याही

खात्याला किंवा राज्यातील कोणत्याही इतर प्राधिकरणाला किंवा संस्थेला निर्देश देऊ शकेल;

(i) आपत्तींच्या अशा प्रकारांसंबंधी, ज्यापासून राज्याचे विविध भाग असुरक्षित आहेत, तेथे सामान्य शिक्षण, जागरुकता आणि सामुदायिक प्रशिक्षण आणि समुदायाद्वारे आपत्ती निवारण व अशा आपत्तीच्या शमनासाठी व त्याला प्रतिसाद देण्यासाठीच्या उपाययोजना यांचा प्रसार करू शकेल;

(j) आपत्ती व्यवस्थापनाच्या कामात गुंतलेली राज्य सरकारची मंत्रालये, जिल्हा प्राधिकरणे, वैधानिक संस्था इतर सरकारी किंवा स्वयंसेवी संस्था यांना सल्ला देऊ शकेल, त्यांच्या कार्यामध्ये साहाय्य करू शकेल व त्यांचे समन्वय करू शकेल;

(k) जिल्हा प्राधिकरणांना व स्थानिक प्राधिकरणांना त्यांची कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य प्रदान करू शकेल किंवा सल्ला देऊ शकेल;

(l) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात सर्व आर्थिक बाबींबाबत राज्य सरकारला सल्ला देऊ शकेल;

(m) राज्यातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रामध्ये होणाऱ्या बांधकामाची तपासणी करू शकेल व आपत्ती निवारणासाठी अशा बांधकामासाठी ठरविलेल्या मानकांचे पालन केले जात नाही किंवा पाळली गेली नाहीत, असे त्यांचे मत असल्यास, स्थितीविशेषानुसार, जिल्हा प्राधिकरणाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला अशी कारवाई करण्यासाठी निर्देश देऊ शकेल जी अशा मानकांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहेत;

(n) राष्ट्रीय प्राधिकरणाला आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध पैलूंशी संबंधित माहिती उपलब्ध करू शकेल;

(o) राज्यस्तरीय प्रतिसाद योजना आणि मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल, त्यांचे पुनरावलोकन करू शकेल व अद्ययावत करू शकेल आणि जिल्हास्तरीय योजना तयार केल्या आहेत, त्यांचे पुनरावलोकन केले आहे व त्या अद्ययावत केल्या आहेत, हे सुनिश्चित करू शकेल;

(p) संपर्क यंत्रणा व्यवस्थित असल्याचे आणि आपत्ती व्यवस्थापन कवायती वेळोवेळी केल्या जातात हे सुनिश्चित करू शकेल;

(q) राज्य प्राधिकरणाने त्यांना सोपविलेली किंवा त्यांना आवश्यक वाटेल अशी इतर कार्ये करू शकेल;

23. राज्य आराखडा- (1) प्रत्येक राज्यासाठी एक आपत्ती व्यवस्थापन आराखडा असेल, ज्याला राज्य आपत्ती व्यवस्थापन आराखडा असे म्हटले जाईल.

(2) राष्ट्रीय कार्यकारी समितीद्वारे, राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे ठरविलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेता आणि स्थानिक प्राधिकरण व जिल्हा प्राधिकरण व लोकप्रतिनिधी यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर, ज्याला राज्य कार्यकारी समिती योग्य समजेल, राज्य आराखडा तयार केला जाईल.

(3) राज्य कार्यकारी समितीद्वारे उप-कलम (2) अन्वये तयार केलेल्या राज्य आराखड्याला राज्य प्राधिकरणाद्वारे मंजूरी दिली जाईल.

(4) राज्य आराखड्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल,-

(a) आपत्तींच्या विविध प्रकारांना राज्यातील विविध भागांची संवेदनशीलता;

(b) आपत्ती निवारणासाठी व शमनासाठी अवलंबिल्या जाणाऱ्या उपाययोजना;

(c) विकास योजनांमध्ये व प्रकल्पांमध्ये शमन उपाययोजनांचे एकीकरण करण्याची पद्धत;

(d) क्षमता निर्माणासाठी व सज्जतेसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना;

(e) खंड (b), (c) आणि (d) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांसंबंधी राज्य सरकारच्या प्रत्येक खात्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या;

(f) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी राज्य सरकारच्या विविध खात्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या;

(5) राज्य आराखड्याचा दरवर्षी पुनरावलोकन करून तो अद्ययावत केला जाईल.

(6) राज्य आराखड्या अंतर्गत करावयाच्या उपाययोजनांच्या वित्तपुरवठ्यासाठी राज्य सरकारद्वारे योग्य त्या तरतुदी करण्यात येतील;

(7) उप-कलम (2) आणि (5) मध्ये संदर्भित राज्य आराखड्याच्या प्रती राज्य सरकारच्या खात्यांना उपलब्ध केल्या जातील आणि अशी खाती राज्य आराखड्यानुसार स्वत:चा आराखडा तयार करतील.

**24. आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती -** आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या समुदायाला साहाय्य व त्यांचे संरक्षण करण्यासाठी किंवा अशा समुदायाला साहाय्य प्रदान करण्यासाठी किंवा कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीचे निवारण करण्यासाठी किंवा त्या आपत्तीच्या निराकरणासाठी किंवा त्याच्या परिणामाला सामोरे जाण्याच्या उद्देशाने राज्य कार्यकारी समिती –

(a) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रामध्ये, तेथून किंवा आत, वाहनांच्या रहदारीला नियंत्रित व निर्बंधित करू शकेल;

(b) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीचा प्रवेश, त्याच्या आतील हालचाली व निघून जाणे, याला नियंत्रित व निर्बंधित करू शकेल;

(c) मलवा हटवू शकेल, शोध घेऊ शकेल व बचावकार्य राबवू शकेल;

(d) राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने ठरवलेल्या मानकांनुसार निवारा, अन्न, पिण्याचे पाणी, अत्यावश्यक तरतुदी, आरोग्य सेवा व सेवा उपलब्ध करू शकेल;

(e) राज्य सरकारच्या संबंधित खात्याला, राज्याच्या स्थानिक हद्दीतील कोणत्याही जिल्हा प्राधिकरणाला किंवा इतर प्राधिकरणाला, जीवन किंवा मालमत्तेच्या बचावासाठी, निर्वासनासाठी किंवा तातडीने मदत पुरवण्यासाठी अशा उपाययोजना किंवा पावले उचलण्यास निर्देश देऊ शकेल, जी त्याच्या मते आवश्यक असेल;

(f) राज्य सरकारचे कोणतेही खाते किंवा इतर कोणतीही संस्था किंवा प्राधिकरण किंवा कोणत्याही संबंधित संसाधनांच्या प्रभारी व्यक्तीकडून आपत्कालीन प्रतिसाद, बचाव आणि साहाय्य या उद्देशाने संसाधने उपलब्ध करुन देण्याची अपेक्षा करू शकेल;

(g) आपत्तीच्या क्षेत्रातील तज्ज्ञ व सल्लागार यांच्याकडून बचाव व साहाय्यासाठी सल्ला व साहाय्य देण्याची अपेक्षा करू शकेल;

(h) जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, कोणत्याही प्राधिकरण किंवा व्यक्तीकडून, सुविधांचा विशेष किंवा प्राधान्यीय वापर घेऊ शकेल;

(i) तात्पुरते पूल किंवा इतर आवश्यक संरचना बांधू शकेल व जनतेला धोकादायक बनू शकतात अशा असुरक्षित संरचना पाडू शकेल;

(j) बिगर सरकारी संस्था त्यांची कार्ये योग्यरित्या व भेदभाव न करता करतात, हे सुनिश्चित करू शकेल;

(k) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीचा किंवा आपत्तीचा सामना करण्यासाठी, लोकांपर्यंत माहिती पोहोचवू शकेल;

(l) केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यासंबंधी निर्देश देईल असे उपाय करू शकेल किंवा कोणत्याही आपत्तीच्या परिस्थितीत किंवा आपत्तीमध्ये आवश्यक किंवा इच्छित असेल असे इतर उपाय करू शकेल;

## प्रकरण IV

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**25. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना -** (1) प्रत्येक राज्य सरकार, कलम 14 च्या उप-कलम (1) अन्वये, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचना जारी झाल्यानंतर लवकरात लवकर, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी अशा नावे, जे त्या अधिसूचनेमध्ये निर्दिष्ट केलेले असेल, एका जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करेल.

(2) जिल्हा प्राधिकरणात एक अध्यक्ष व इतर सदस्यांची संख्या राज्य सरकारने विहित केल्याप्रमाणे सात पेक्षा जास्त असणार नाही व जोपर्यंत नियमात अन्यथा तरतूद नसेपर्यंत, त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल, ते म्हणजे:-

(a) जिल्ह्याच्या स्थितीविशेषानुसार, जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी, किंवा उपायुक्त, हे अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

(b) स्थानिक प्राधिकरणाचा निवडलेला प्रतिनिधी, हे सह-अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

परंतु घटनेच्या सहाव्या परिशिष्टामध्ये जसे संदर्भित आहे, आदिवासी क्षेत्रांमध्ये, स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी सदस्य, हे सह-अध्यक्ष असतील, *पदसिद्ध*;

(c) जिल्हा प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, *पदसिद्ध*;

(d) पोलिस अधीक्षक, *पदसिद्ध*;

(e) जिल्ह्याचे मुख्य वैद्यकीय अधिकारी, *पदसिद्ध*;

(f) इतर जिल्हास्तरीय अधिकारी दोन पेक्षा जास्त नाही, ज्यांना राज्य सरकारद्वारे नियुक्त केले जाईल.

(3) जिल्हा परिषद अस्तित्त्वात असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात, त्याचे अध्यक्ष जिल्हा प्राधिकरणाचे सह-अध्यक्ष असतील.

(4) राज्य सरकार, जिल्ह्यातील कोणत्याही अशा अधिकाऱ्याला, जो स्थितीविशेषानुसार, अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी किंवा अतिरिक्त उपायुक्त या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसावा, अशा अधिकारांचा वापर व कार्यांचे पालन करण्यासाठी जी, राज्य सरकारद्वारे विहित केलेली असतील व अशा इतर

अधिकारांचा वापर व कार्यांचे पालन करण्यासाठी जी, जिल्हा प्राधिकरणाद्वारे त्याला सोपविण्यात आलेली आहेत, जिल्हा प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करेल.

**26. जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षांचे अधिकार** – (1) जिल्हा प्राधिकरणाचे अध्यक्ष, जिल्हा प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्षत्व करण्याव्यतिरिक्त, जिल्हा प्राधिकरणाच्या अशा अधिकारांचा वापर व कार्ये करतील जी जिल्हा प्राधिकरण त्याला सोपवेल.

(2) जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षांना, आपत्कालीन परिस्थितीत, जिल्हा प्राधिकरणाच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचे अधिकार असतील परंतु अशा अधिकारांचा वापर जिल्हा प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन राहून असेल.

(3) जिल्हा प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाचे अध्यक्ष, सामान्य किंवा विशेष लिखित आदेशाद्वारे, स्थितीविशेषानुसार, उप-कलम (1) किंवा (2) अन्वये, त्यांचे अधिकार किंवा त्यांच्या कार्यांमधून असे अधिकार व कार्ये, जिल्हा प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला, अशा अटी व शर्ती, जर काही असल्यास, जी त्यांना आवश्यक वाटल्यास, अधीन राहून, सोपवू शकेल.

**27. बैठका** – जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षांना ज्या वेळी व ज्या ठिकाणी योग्य वाटेल त्या वेळी जिल्हा प्राधिकरणाची बैठक होईल.

**28. सल्लागार समिती आणि इतर समित्यांची स्थापना** - (1) जिल्हा प्राधिकरण, जेव्हा त्याला आवश्यक वाटेल, त्याची कार्ये कार्यक्षमपणे होण्यासाठी एक किंवा अधिक सल्लागार समित्यांची व इतर समित्यांची स्थापना करु शकेल.

(2) जिल्हा प्राधिकरण, आपल्या सदस्यांपैकी, उप-कलम (1) मध्ये संदर्भित केल्यानुसार, समितीचा अध्यक्ष नियुक्त करेल.

(3) उप-कलम (1) अन्वये घटित, कोणत्याही समिती किंवा उप-समितीमध्ये तज्ज्ञ म्हणून संबंधित कोणत्याही व्यक्तीस असे भत्ते दिले जाऊ शकेल, जे राज्य सरकारने विहित केलेले असेल.

**29. जिल्हा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक -** राज्य सरकार जिल्हा प्राधिकरणाला जिल्हा प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल, तितके अधिकारी, सल्लागार व इतर कर्मचारी पुरवेल.

**30. जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती –** (1) जिल्हा प्राधिकरण, आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा नियोजन, समन्वय व अंमलबजावणी संस्था म्हणून काम करेल आणि राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे व राज्य प्राधिकरणाद्वारे ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाच्या उद्देशाने सर्व उपाययोजना करेल.

(2) उप-कलम (1) च्या पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता, जिल्हा प्राधिकरण -

(i) जिल्ह्यासाठी जिल्हा प्रतिसाद योजनेसह आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करू शकेल;

(ii) राष्ट्रीय धोरण, राज्य धोरण, राष्ट्रीय आराखडा, राज्य आराखडा व जिल्हा आराखडा यांच्या अंमलबजावणीचे समन्वय व देखरेख करू शकेल;

(iii) जिल्ह्यातील आपत्तीचे संवेदनशील क्षेत्र ओळखलेले आहेत व आपत्ती निवारण व त्याच्या परिणामाच्या शमनासाठी जिल्हास्तरावर सरकारच्या खात्यांद्वारे तसेच स्थानिक प्राधिकरणाद्वारे उपाययोजना केल्या आहेत, हे सुनिश्चित करू शकेल;

(iv) आपत्ती निवारण व त्याच्या परिणामाचे शमन, तयारी व प्रतिसाद उपाययोजनांसाठी, राष्ट्रीय प्राधिकरण व राज्य प्राधिकरणाने ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांचे, जिल्हास्तरावर सरकारच्या सर्व खात्यांद्वारे व जिल्ह्यात स्थानिक प्राधिकरणांद्वारे पालन केले जात आहे, हे सुनिश्चित करू शकेल;

(v) जिल्हा स्तरावरील विविध प्राधिकरणांना व स्थानिक प्राधिकरणांना आपत्ती निवारण किंवा शमनासाठी अशा इतर उपाययोजना करण्यासाठी, जे आवश्यक आहेत ते, निर्देश देऊ शकेल;

(vi) जिल्हा स्तरावरील सरकारी खाती व जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणाद्वारे आपत्ती व्यवस्थापन प्रतिबंध योजनांसाठी मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल;

(vii) जिल्हास्तरावर सरकारच्या खात्यांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(viii) जिल्हास्तरावर सरकारच्या खात्यांद्वारे त्यांच्या विकास योजना व प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण व शमनासाठी उपाययोजनांचे एकीकरणाच्या उद्देशाने अनुसरण केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल व त्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य प्रदान करू शकेल;

(ix) खंड (viii) मध्ये संदर्भित उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवू शकेल;

(x) जिल्ह्यातील कोणत्याही आपत्ती किंवा आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठी राज्याच्या क्षमतांच्या स्थितीचे पुनरावलोकन करू शकेल आणि त्यांच्या उन्नतीकरणासाठी जिल्हा स्तरावरील संबंधित खात्यांना किंवा प्राधिकरणांना, जे आवश्यक आहेत ते, निर्देश देऊ शकेल;

(xi) सज्जता उपाययोजनांचे पुनरावलोकन करू शकेल व जिल्हा स्तरावर संबंधित खात्यांना किंवा इतर संबंधित प्राधिकरणांना, जेथे कोणतीही आपत्ती किंवा आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी, सज्जता उपाययोजनांना आवश्यक पातळीवर आणण्यास आवश्यक असल्यास, निर्देश देऊ शकेल;

(xii) जिल्ह्यात विविध स्तरावरील अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवी बचाव कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करू शकेल व त्याचे समन्वय करू शकेल;

(xiii) आपत्ती निवारण किंवा शमनासाठी स्थानिक प्राधिकरणांना, सरकारी व स्वयंसेवी संस्था यांच्या सहाय्याने सामुदायिक प्रशिक्षण व जागरूकता कार्यक्रमांना सुलभ करू शकेल;

(xiv) जनतेला धोक्याच्या पूर्व सूचना व योग्य माहिती देण्यासाठी यंत्रणा स्थापना करू शकेल, त्याची देखरेख, पुनरावलोकन व उन्नतीकरण करू शकेल;

(xv) जिल्हास्तरीय प्रतिसाद योजना व मार्गदर्शक सूचना तयार करू शकेल, त्यांचे पुनरावलोकन करू शकेल व अद्ययावत करू शकेल;

(xvi) कोणत्याही आपत्ती किंवा आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला समन्वयीत प्रतिसाद देऊ शकेल;

(xvii) जिल्हास्तरावर सरकारी खाती व स्थानिक प्राधिकरणे, जिल्हा प्रतिसाद योजनेनुसार त्यांच्या प्रतिसाद योजना तयार करतात, हे सुनिश्चित करू शकेल;

(xviii) जिल्हास्तरावर संबंधित सरकारी खाते किंवा जिल्ह्याच्या स्थानिक हद्दीत इतर प्राधिकरणांसाठी, कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रभावीपणे प्रतिसादासाठी उपाययोजना करण्यासाठी, मार्गदर्शक सूचना ठरवू शकेल किंवा त्यांना निर्देश देऊ शकेल;

(xix) जिल्हा स्तरावर सरकारी खाती, वैधानिक संस्था आणि जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनात गुंतलेल्या इतर सरकारी व स्वयंसेवी संस्थांना सल्ला देऊ शकेल, त्यांना साहाय्य करू शकेल व त्यांच्या उपक्रमांचे समन्वय करू शकेल;

(xx) जिल्ह्यातील आपत्तीची भीतीदायक परिस्थिती किंवा आपत्तीमध्ये निवारण किंवा शमनासाठीच्या उपाययोजना तातडीने व प्रभावीपणे केल्या जातात हे सुनिश्चित करण्यासाठी, जिल्ह्यात स्थानिक प्राधिकरणाशी समन्वय करू शकेल व त्यांना निर्देश देऊ शकेल;

(xxi) जिल्ह्यात स्थानिक प्राधिकरणांना त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक तांत्रिक साहाय्य उपलब्ध करू शकेल किंवा त्यांना सल्ला देऊ शकेल;

(xxii) जिल्हास्तरावर सरकारी खाती, वैधानिक प्राधिकरण किंवा स्थानिक प्राधिकरणांद्वारे आपत्ती निवारण किंवा त्याच्या शमनासाठी तयार केलेल्या विकास योजनांचे, आवश्यक त्या तरतुदी करण्याच्या उद्देशाने, पुनरावलोकन करू शकेल;

(xxiii) जिल्ह्यातील कोणत्याही क्षेत्रामध्ये होणाऱ्या बांधकामाची तपासणी करू शकेल व आपत्ती निवारणासाठी अशा बांधकामासाठी ठरविलेल्या मानकांचे पालन

केले जात नाही किंवा पाळली गेली नाहीत, असे त्यांचे मत असल्यास, स्थितीविशेषानुसार, संबंधित प्राधिकरणाला अशी कारवाई करण्यासाठी निर्देश देऊ शकेल जी अशा मानकांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहेत;

(xxiv) अशा इमारती व ठिकाणे ओळखू शकेल ज्यांचा कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीत किंवा आपत्ती उद्भवल्यास, मदत केंद्रे किंवा शिबिरे म्हणून वापर केला जाऊ शकेल आणि अशा इमारतींमध्ये किंवा ठिकाणी पाणीपुरवठा व स्वच्छतेची व्यवस्था करू शकेल;

(xxv) मदत व बचाव सामग्रीचा साठा तयार करू शकेल किंवा अल्पावधी आगावू सूचनेवर अशा प्रकारची सामग्री उपलब्ध करण्याची तयारी सुनिश्चित करू शकेल;

(xxvi) आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध पैलूंशी संबंधित राज्य प्राधिकरणाला माहिती देऊ शकेल;

(xxvii) जिल्ह्यात तळागाळात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसेवी समाज-कल्याण संस्थांना, आपत्ती व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करू शकेल;

(xxviii) संपर्क यंत्रणा व्यवस्थित आहेत आणि आपत्ती व्यवस्थापन कवायती वेळोवेळी केल्या जातात, हे सुनिश्चित करू शकेल;

(xxix) राज्य सरकार किंवा राज्य प्राधिकरणाने त्यांना सोपविलेली किंवा जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक आहेत अशी इतर कार्ये करू शकेल.

31. **जिल्हा आराखडा** - (1) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापनासाठी एक आराखडा असेल.

(2) जिल्हा प्राधिकरणाद्वारे, स्थानिक प्राधिकरणाशी सल्लामसलत केल्यानंतर आणि राष्ट्रीय आराखडा व राज्य आराखडा लक्षात घेता, जिल्हा आराखडा तयार केला जाईल जो राज्य प्राधिकरणाद्वारे मान्यता दिली जाईल.

(3) जिल्हा आराखड्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल-

(a) जिल्ह्यातील असे क्षेत्र जे आपत्तींच्या विविध प्रकारांना संवेदनशील आहेत;

(b) जिल्हा स्तरावरील सरकारी खाती व जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांद्वारे आपत्ती निवारण व शमनासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना;

(c) जिल्हा स्तरावर सरकारी खाती व जिल्ह्यात स्थानिक प्राधिकरणांद्वारे कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक क्षमता निर्माण व सज्जतेसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना;

(d) आपत्तीच्या परिस्थितीत, प्रतिसाद योजना व कार्यपद्धती, ज्यामध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी असाव्यात-

(i) जिल्हा स्तरावरील सरकारी खाती व जिल्ह्यात स्थानिक प्राधिकरणांना जबाबदाऱ्यांचे वाटप;

(ii) आपत्तीला त्वरित प्रतिसाद व त्यापासून बचाव;

(iii) आवश्यक संसाधनांची खरेदी;

(iv) संपर्क यंत्रणांच्या दुव्यांची स्थापना; आणि

(v) जनतेपर्यंत माहितीचा प्रसार;

(e) अशा इतर बाबी ज्या राज्य प्राधिकरणाला आवश्यक आहेत.

(4) जिल्हा आराखड्याचे दरवर्षी पुनरावलोकन केले जाईल व तो अद्ययावत केला जाईल.

(5) उप-कलम (2) व (4) मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे, जिल्हा आराखड्याच्या प्रती जिल्ह्यातील सरकारी खात्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

(6) जिल्हा प्राधिकरण जिल्हा आराखड्याची एक प्रत, राज्य प्राधिकरणाला पाठवेल जी ते राज्य सरकारकडे अग्रेषित करेल.

(7) जिल्हा प्राधिकरण वेळोवेळी, आराखड्याच्या अंमलबजावणीचे पुनरावलोकन करेल व जिल्ह्यातील सरकारच्या विविध खात्यांना अशा सूचना जारी करेल, ज्या ते अंमलबजावणीसाठी आवश्यक समजेल.

32. **जिल्हास्तरावर वेगवेगळ्या प्राधिकरणांद्वारे आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी** - जिल्हास्तरावर भारत सरकार व राज्य सरकारचे प्रत्येक कार्यालय व स्थानिक प्राधिकरण जिल्हा प्राधिकरणाच्या देखरेखीखाली राहता-

(a) आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करेल ज्यामध्ये खालीलप्रमाणे असेल, म्हणजे:-

(i) जिल्हा आराखड्यात प्रदान केलेल्या निवारण व शमन उपाययोजनांसाठी तरतुदी, ज्या संबंधित खात्याला किंवा संस्थेला नेमून दिलेल्या आहेत;

(ii) जिल्हा आराखड्यात ठरविल्यानुसार क्षमता निर्माण आणि तयारीशी संबंधित उपाययोजना करण्याच्या तरतुदी;

(iii) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीत किंवा आपत्ती उद्भवल्यास , प्रतिसाद योजना आणि कार्यपद्धती;

(b) स्थानिक प्राधिकरण, समुदाय व इतर भागधारक यांच्यासह जिल्हास्तरावर इतर संघटनांच्या आराखड्यासह आपल्या आराखड्याची तयारी व अंमलबजावणीसाठी समन्वय करेल;

(c) नियमितपणे आराखड्याचे पुनरावलोकन करेल व तो अद्ययावत करेल; आणि

(d) जिल्हा प्राधिकरणाला आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची व त्याच्या कोणत्याही दुरुस्तीची एक प्रत प्रस्तुत करेल.

33. **जिल्हा प्राधिकरणाद्वारे अधिग्रहण** - जिल्हा प्राधिकरण आदेशाद्वारे, जिल्हास्तरावर कोणताही अधिकारी किंवा कोणतेही खाते किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून अशी अपेक्षा करू शकेल की, त्यांनी आपत्ती निवारण किंवा शमनासाठी किंवा त्याला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी ज्या आवश्यक आहेत त्या उपाययोजना कराव्यात, आणि असा अधिकारी किंवा खाते अशा आदेशाचे पालन करण्यास बांधील असेल.

34. **कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपद्धती** - कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीमध्ये समुदायाला मदत करणे, त्यांचे रक्षण करणे किंवा त्यांना साहाय्य देण्याच्या उद्देशाने, जिल्हा प्राधिकरण-

(a) जिल्ह्यात कोणत्याही सरकारी खात्याकडे व स्थानिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली संसाधने प्रदान करण्यासाठी व वापरासाठी निर्देश देऊ शकेल;

(b) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रामध्ये, तेथून किंवा आत, वाहनांच्या रहदारीला नियंत्रित व निर्बंधित करू शकेल;

(c) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीचा प्रवेश, त्याच्या आतील हालचाली व प्रस्थान, याला नियंत्रित व निर्बंधित करू शकेल;

(d) मलवा हटवू शकेल, शोध घेऊ शकेल व बचावकार्य राबवू शकेल;

(e) निवारा, अन्न, पिण्याचे पाणी, अत्यावश्यक तरतुदी, आरोग्य सेवा व सेवा प्रदान करू शकेल;

(f) प्रभावित क्षेत्रामध्ये आपत्कालीन संपर्क यंत्रणेची स्थापना करू शकेल;

(g) कोणीही दावा न केलेल्या मृतदेहांची अंतिम संस्काराची व्यवस्था करू शकेल;

(h) जिल्हा पातळीवर राज्य सरकारच्या कोणत्याही खात्याला किंवा त्या सरकारच्या अधीन कोणत्याही प्राधिकरण किंवा संस्थेला अशा आवश्यक उपाययोजना करण्याची शिफारस करू शकेल जी त्यांच्या मते आवश्यक आहे;

(i) संबंधित क्षेत्रामध्ये सल्ला व साहाय्य करण्यासाठी तज्ज्ञ व सल्लागारांची, जे ते आवश्यक समजेल, अपेक्षा करू शकेल;

(j) कोणत्याही प्राधिकरण किंवा व्यक्तीकडून, सुविधांचा विशेष किंवा प्राधान्यीय वापर घेऊ शकेल;

(k) तात्पुरते पूल किंवा इतर आवश्यक संरचना बांधू शकेल व जनतेला धोकादायक बनू शकतात किंवा आपत्तीचे परिणाम तीव्र बनवू शकतात, अशा असुरक्षित संरचना पाडू शकेल;

(l) स्वयंसेवी संस्था त्यांची कार्ये योग्यरित्या व भेदभाव न करता करतात, हे सुनिश्चित करू शकेल;

(m) अशी इतर पावले उचलू शकेल, जी अशा परिस्थितीत करणे आवश्यक किंवा ठरविलेली असेल;

## प्रकरण V

## आपत्ती व्यवस्थापनासाठी सरकारद्वारे करावयाच्या उपाययोजना

**35. केंद्र सरकारने करावयाच्या उपाययोजना** – (1) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहता, आपत्ती व्यवस्थापनाच्या उद्देशाने आवश्यक किंवा उपयुक्त असलेल्या अशा सर्व उपाययोजना करेल.

(2) विशेषत: व उप-कलम (1) च्या पूर्वगामी उपबंधाच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता, केंद्र सरकार त्या उप-कलमांतर्गत अशा उपाययोजना करू शकेल, ज्यामध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसंदर्भात उपाययोजना समाविष्ट आहेत, त्या म्हणजे:-

(a) आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात भारत सरकारची, मंत्रालये किंवा खाती, राज्य सरकारे, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांच्या कृतींचे समन्वय करणे;

(b) भारत सरकारची मंत्रालये किंवा खात्यांद्वारे आपल्या विकास योजना व प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण व शमनासाठीच्या उपाययोजनांचे एकीकरण सुनिश्चित करणे;

(c) भारत सरकारची मंत्रालये किंवा खात्याद्वारे आपत्ती निवारण, शमन, क्षमता निर्माण व सज्जतेसाठी निधीचे योग्य वाटप केल्याचे सुनिश्चित करणे;

(d) भारत सरकारची मंत्रालये किंवा खाती कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला त्वरित व प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करतात, हे सुनिश्चित करणे;

(e) राज्य सरकारांना त्यांच्या विनंतीनुसार किंवा त्यांना अन्यथा योग्य वाटल्यास सहकार्य व साहाय्य देणे;

(f) नौदल, लष्कर व हवाई दल, केंद्राची इतर सशस्त्र सेना किंवा इतर कोणत्याही नागरी कर्मचाऱ्यांना तैनात करणे ज्यांची या अधिनियमाच्या उद्देशाने आवश्यकता असू शकते;

(g) या अधिनियमाच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय संस्था व विदेशी देशांच्या सरकारांशी समन्वय करणे;

(h) आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात संशोधन, प्रशिक्षण व विकासात्मक कार्यक्रमांसाठी संस्था स्थापन करणे;

(i) अशा इतर बाबी, ज्या या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, ते आवश्यक किंवा उपयुक्त समजेल.

(3) केंद्र सरकार मोठ्या आपत्तीने प्रभावित इतर देशांना अशी मदत देऊ शकेल, जी ते योग्य समजेल.

**36. भारत सरकारच्या मंत्रालयांच्या किंवा खात्यांच्या जबाबदाऱ्या -** भारत सरकारच्या प्रत्येक मंत्रालयाची किंवा खात्याची ही जबाबदारी असेल की त्यांनी-

(a) राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरविलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्ती निवारण, शमन, तयारी व क्षमता निर्माण यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात;

(b) राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरवलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्ती निवारण किंवा शमन यासाठीच्या उपाययोजनांचा त्यांच्या विकास योजना व प्रकल्पांमध्ये एकीकृत कराव्यात;

(c) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना किंवा या निमित्त, राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या निर्देशानुसार, कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रभावीपणे व त्वरित प्रतिसाद देणे;

(d) आपत्ती निवारण, शमन किंवा तयारीसाठी आवश्यक तरतुदींचा समावेश करण्याच्या दृष्टीने, त्यांच्याद्वारे प्रशासित कायदे, त्यांची धोरणे, नियम व कायद्यांचे पुनरावलोकन करावे;

(e) आपत्ती निवारण, शमन, क्षमता-निर्माण व तयारीच्या उपाययोजनांसाठी निधीचे वाटप करावे;

(f) राष्ट्रीय प्राधिकरण व राज्य सरकारांना खालीलसाठी साहाय्य प्रदान करावे-

(i) आपत्ती व्यवस्थापनासंबंधी शमन, तयारी व प्रतिसाद योजना तयार करणे, क्षमता-निर्माण, माहिती संकलन व कर्मचाऱ्यांची ओळख व प्रशिक्षण;

(ii) प्रभावित क्षेत्रामध्ये बचाव व मदतकार्य करणे;

(iii) कोणत्याही आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन करणे;

(iv) पुनर्वसन व पुनर्निर्माण करणे;

(g) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला त्वरित व प्रभावीपणे प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने, आपली संसाधने राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समितीला उपलब्ध करून देणे, ज्यामध्ये पुढील उपाययोजना आहेत-

(i) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रामध्ये आपत्कालीन संपर्क यंत्रणा प्रदान करणे;

(ii) प्रभावित क्षेत्रामध्ये व तेथून कर्मचारी व मदत सामग्रीची वाहतूक करणे;

(iii) निर्वासन, बचाव, तात्पुरता निवारा किंवा इतर त्वरित साहाय्य प्रदान करणे;

(iv) तात्पुरते पूल, जेटी व लँडिंग जागा स्थापित करणे;

(v) एखाद्या प्रभावित क्षेत्रामध्ये पिण्याचे पाणी, आवश्यक तरतुदी, आरोग्य सेवा व सेवा प्रदान करणे;

(h) अशी इतर कार्ये करणे जी आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक आहेत.

**37. भारत सरकारच्या मंत्रालयांचे किंवा खात्यांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे. -**

(1) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा खाते-

(a) पुढील तपशील निर्दिष्ट करून, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करेल, ते म्हणजे:-

(i) त्यांच्याद्वारे आपत्ती निवारण व शमनासाठी राष्ट्रीय आराखड्यानुसार केल्या जाणाऱ्या उपाययोजना;

(ii) राष्ट्रीय प्राधिकरण व राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या विकास योजनांमध्ये शमन उपाययोजनांच्या एकीकरणाबाबत विनिर्देश;

(iii) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीचा सामना करण्यासंबंधी सज्जता व क्षमता-निर्माण संदर्भात त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या;

(iv) कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला त्वरित व प्रभावीपणे प्रतिसाद देण्याबाबत त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या;

(v) उप-खंड (iii) व (iv) मध्ये निर्दिष्ट, सज्जतेच्या त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांची सद्यस्थिती;

(vi) उप-खंड (iii) व (iv) मध्ये निर्दिष्ट, त्यांच्या जबाबदाऱ्यांचे पालन करण्यास सक्षम बनविण्यासाठी केल्या जाणाऱ्या आवश्यक उपाययोजना;

(b) खंड (a) मध्ये संदर्भित आराखड्याचे वार्षिक पुनरावलोकन करेल व अद्ययावत करेल;

(c) स्थितीविशेषानुसार, खंड (a) किंवा खंड (b) मध्ये संदर्भित, आराखड्याची एक प्रत केंद्र सरकारला अग्रेषित करेल, सरकार ती मान्यतेसाठी राष्ट्रीय प्राधिकरणाकडे पाठवेल.

(2) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा खाते-

(a) उप-कलम (1) च्या खंड (a) अन्वये, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला जात असताना त्यामध्ये निर्दिष्ट, उपक्रमांना वित्तपुरवठ्यासाठी तरतूद करेल;

(b) राष्ट्रीय प्राधिकरणाला उप-कलम (1) च्या खंड (a) मध्ये संदर्भित,आराखड्याच्या अंमलबजावणीसंदर्भात स्थिती अहवाल, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा, देईल.

**38. राज्य सरकारने करावयाच्या उपाययोजना** – (1) या कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहता, प्रत्येक राज्य सरकार राष्ट्रीय प्राधिकरणाने ठरवलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये निर्दिष्ट, सर्व उपाययोजना करेल व अशा आणखीन उपाययोजना करेल ज्या आपत्ती व्यवस्थापनाच्या उद्देशाने ते आवश्यक किंवा उपयुक्त समजेल.

(2) राज्य सरकार उप-कलम (1) अन्वये ज्या उपाययोजना करू शकेल त्यामध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसंदर्भात उपाययोजना समाविष्ट आहेत, त्या म्हणजेः

(a) राज्य सरकारची विविध खाती, राज्य प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरण, स्थानिक प्राधिकरण व इतर स्वयंसेवी संस्था यांच्या कार्याचे समन्वय करणे;

(b) आपत्ती व्यवस्थापनात राष्ट्रीय प्राधिकरण व राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य प्राधिकरण व राज्य कार्यकारी समिती व जिल्हा प्राधिकरण यांना सहकार्य व साहाय्य करणे;

(c) भारत सरकारची मंत्रालये किंवा खात्यांच्या आपत्ती व्यवस्थापनात असे सहकार्य किंवा साहाय्य, ज्यासाठी त्यांच्याद्वारे विनंती केली असेल किंवा अन्यथा त्यांना योग्य वाटल्यास;

(d) राज्य सरकारच्या खात्यांद्वारे आपत्ती निवारण, शमन, क्षमता-निर्माण व सज्जतेसाठी राज्य आराखडा व जिल्हा आराखड्याच्या तरतुदींनुसार, उपाययोजनांसाठी निधीचे वाटप करणे;

(e) राज्य सरकारच्या खात्यांद्वारे आपल्या विकास योजना व प्रकल्पांमध्ये आपत्ती निवारण किंवा शमनासाठी उपाययोजनांचे एकीकरण सुनिश्चित करणे;

(f) राज्याच्या विविध भागांमध्ये वेगवेगळया आपत्तींची संवेदनशीलता कमी करण्यासाठी किंवा शमन करण्यासाठी राज्य विकास आराखड्यामध्ये उपाययोजनांचे एकीकरण करणे;

(g) राज्याच्या विविध खात्यांद्वारे राष्ट्रीय प्राधिकरण आणि राज्य प्राधिकरणाद्वारे ठरवलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे सुनिश्चित करणे;

(h) संवेदनशील समुदायांच्या स्तरापर्यंत पुरेशी चेतावणी प्रणालीची स्थापना करणे;

(i) राज्य सरकारची विविध खाती व जिल्हा प्राधिकरण योग्य त्या सज्जतेसाठी उपाययोजना करतात, हे सुनिश्चित करणे;

(j) आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीमध्ये, राज्य सरकारच्या विविध खात्यांची संसाधने, कोणत्याही आपत्तीच्या भीतीदायक परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीला प्रभावी प्रतिसाद, बचाव व साहाय्याच्या उद्देशाने, स्थितीविशेषानुसार, राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणाला उपलब्ध केलेली आहेत, हे सुनिश्चित करणे;

(k) कोणत्याही आपत्तीने ग्रस्त पीडितांचे पुनर्वसन करणे व त्यांना पुनर्निर्माणामध्ये साहाय्य करणे; आणि

(l) अशा इतर बाबी ज्या या कायद्याच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशासाठी, ते आवश्यक किंवा उपयुक्त समजेल.

**39. राज्य सरकारच्या खात्यांच्या जबाबदाऱ्या,-**

राज्य सरकारच्या प्रत्येक विभागाची ही जबाबदारी असेल की त्यांनी-

(क) राष्ट्रीय प्राधिकरण आणि राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून आपत्ती प्रतिबंध, शमन, सज्जता आणि क्षमता निर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेले उपाय योजावे;

(ख) आपल्या विकास योजना आणि प्रकल्पांमध्ये आपत्तीचे निवारण आणि शमनासाठीच्या उपायांना एकीकृत करावे;

(ग) आपत्ती प्रतिबंध, शमन, सज्जता आणि क्षमता निर्मितीसाठी निधीची तजवीज करावी;

(घ) कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीला राज्याच्या योजनेनुसार राष्ट्रीय कार्यकारी समिती आणि राज्य कार्यकारी समितिच्या मार्गदर्शक तत्वांना किंवा निर्देशांना अनुसरून प्रभावी रूपाने आणि तत्परतेने प्रतिसाद द्यावा;

(ङ) आपत्तींचे निवारण, शमन किंवा त्यांच्यासाठी तयारी करण्यासाठी आवश्यक तरतुदींचा अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने तिच्याद्वारे प्रशासित कायदे, तिची धोरणे, नियम आणि विनियमांचे पुनरावलोकन करावे;

(च) खालील बाबींसाठी राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य कार्यकारी समिती आणि जिल्हा प्राधिकरणांद्वारे आवश्यकते प्रमाणे मदत पुरवावी-

(i) शमन, सज्जता आणि प्रतिसाद, क्षमता निर्मिती, डाटा संग्रहण आणि आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित कर्मचाऱ्यांची निवड आणि प्रशिक्षण यासाठी योजना तयार करणे;

(ii) कोणत्याही आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मुल्यमापन करणे;

(iii) पुनर्वसन आणि पुनर्बांधणीचे काम करणे;

(छ) जिल्हा स्तरावर आपल्या प्राधिकाऱ्यांद्वारे जिल्हा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य प्राधिकरणाकडे सल्लामसलत करून संसाधनांची तरतूद करावी;

(ज) राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणांना राज्यात कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीला तत्परतेने आणि पूर्ण क्षमतेने सामोरे जाण्यासाठी, ज्यामध्ये खालील गोष्टींसाठीही उपाय करावे लागतील, आपली संसाधने उपलब्ध करावी-

(i) संवेदनशील किंवा प्रभावित क्षेत्रांमध्ये आपत्कालीन संप्रेषण सुविधा उपलब्ध करणे;

(ii) कर्मचारी आणि बचाव सामग्रीची प्रभावित क्षेत्रापर्यंत किंवा तिथून बाहेर वाहतूक करणे;

(iii) स्थलांतर, बचाव, तात्पुरता आश्रय किंवा इतर तातडीची मदत पुरविणे;

(iv) कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीच्या क्षेत्रातून लोकांचे किंवा जनावरांचे स्थलांतर करणे;

(v) तात्पुरते पूल, जेटी आणि हवाई पट्ट्या उभारणे;

(vi) प्रभावित क्षेत्रामध्ये पिण्याचे पाणी, आवश्यक रसद, आरोग्य देखरेख सेवा उपलब्ध करणे;

(झ) आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी इतर तत्सम कार्ये करणे.

**40. राज्याच्या खात्यांचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा.-**

(1) राज्य सरकारचा प्रत्येक विभाग, राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून -

(क) एक आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करील ज्यामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव असेलः-

(i) अशा आपत्तींचे प्रकार ज्यांच्यामुळे राज्याचे विविध भाग असुरक्षित आहेत;

(ii) आपत्तींचे निवारण किंवा त्यांच्या प्रभावाचे शमन किंवा दोन्हींसाठी रणनीतिंचे त्या विभागाद्वारे विकास योजना आणि कार्यक्रमांबरोबर एकीकरण;

(iii) कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीच्या स्थितीमध्ये आणि त्या आपत्कालीन मदत कार्यांप्रती, जी केली जाण्याची त्याच्याकडून अपेक्षा आहे, अशा राज्य सरकारच्या त्या विभागाची भुमिका आणि जबाबदारी;

(iv) उप-कलम (iii) अंतर्गत अशी भुमिका किंवा जबाबदारी किंवा आपत्कालीन मदत कार्य करण्याच्या तयारीची त्याची वर्तमान स्थिती;

(v) कलम 37 अंतर्गत भारत सरकारची मंत्रालये किंवा विभागांना त्यांच्या जबाबदारीचे पालन करण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी केले जाणारे क्षमता निर्मिती आणि तयारीचे उपाय;

(ख) कलम (क) मध्ये दिलेल्या योजनांचे वार्षिक पुनरावलोकन आणि अद्ययावतन करणे; आणि

(ग) राज्य प्राधिकरणाला, यथास्थिती, विभाग (क) किंवा विभाग (ख) मध्ये दिलेल्या योजनेची प्रत देणे.

(2) राज्य सरकारचा प्रत्येक विभाग, उप-कलम (1) अंतर्गत योजना तयार करताना, तिच्यामध्ये उपरोल्लेखित क्रियाकलापांसाठी निधी पुरविण्याची तरतूद करील;

(3) राज्य सरकारचा प्रत्येक विभाग राज्य कार्यकारी समितिला उप-कलम (1) मध्ये दिलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी एक अंमलबजावणी स्थिती अहवाल सादर करील.

## प्रकरण 6

## स्थानिक प्राधिकरण

**41. स्थानिक प्राधिकाऱ्याची कार्यपद्धती.-**

(1) स्थानिक प्राधिकारी, जिल्हा प्राधिकरणाच्या निर्देशांचे पालन करून-

(क) त्याचे अधिकारी आणि कर्मचारी आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित आहेत हे सुनिश्चित करील;

(ख) कोणतीही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीच्यावेळी वापरण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन संसाधने सहजपणे वापरण्यायोग्य स्थितीत ठेवली आहेत हे सुनिश्चित करील;

(ग) त्याच्या अंतर्गत किंवा त्याच्या कार्यक्षेत्राखालील सर्व बांधकाम प्रकल्प राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण आणि जिल्हा प्राधिकरणांनी आपत्ती प्रतिबंध आणि शमनासाठी निर्धारित केलेल्या मानकांच्या आणि विनिर्देशांच्या नियमां बरहुकूम आहेत हे सुनिश्चित करील;

(घ) प्रभावित क्षेत्रामध्ये राज्य आराखडा आणि जिल्हा आराखडा यांच्या अनुषंगाने मदत, पुनर्वसन आणि पुनर्बांधणीचे क्रियाकलाप करील;

(2) स्थानिक प्राधिकारी असे इतर उपाय करू शकेल ज्यांना तो आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक समजेल.

## प्रकरण 7

# राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था

**42. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था -**

(1) अशा तारीखेपासून जी केंद्र सरकारद्वारे, राजपत्रामध्ये अधिसूचित करून, या निमित्ताने ठरविली जाईल, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था या नावाने एका संस्थेची स्थापना केली जाईल.

(2) या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेमध्ये केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या संख्येचे सदस्य असतील.

(3) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांचा कार्यकाळ आणि त्यातील रिक्त पदे तसेच अशी रिक्त पदे भरण्याची पद्धती, जी निर्धारित केली जाईल ती असेल.

(4) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे एक नियामक मंडळ असेल ज्याची रचना, केंद्र सरकारद्वारा राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांमधून, जी पद्धत निर्धारित केली जाईल, तिच्या प्रमाणे करण्यात येईल.

(5) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या नियामक मंडळाला असे अधिकार असतील, तसेच ते अशी कार्ये करील, जी विनियमांमध्ये निर्धारित केली जातील.

(6) नियामक मंडळाद्वारे त्याच्या अधिकारांचा उपयोग आणि त्याची कार्यकर्तव्ये बजावण्यासाठी अवलंबण्याची प्रक्रिया आणि नियामक मंडळाच्या सदस्यांचा कार्यकाळ, त्यांच्या रिक्त जागा भरण्याची पद्धती हे सर्व विनियमांमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे केले जाईल.

(7) या कलमा अंतर्गत विनियम तयार केले जाई पर्यंत, केंद्र सरकार असे विनियम तयार करू शकेल; आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेद्वारे तिचे अधिकार वापरून असे विनियम बदलले किंवा रद्द केले जाऊ शकतील.

(8) या अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या विस्तृत धोरणांच्या आणि मार्गदर्शक तत्वांच्या कक्षेत राहून कार्य करील आणि ते आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रामध्ये प्रशिक्षण आणि संशोधनाचे नियोजन आणि प्रसार, आपत्ती व्यवस्थापन धोरणांशी संबंधित राष्ट्रीय पातळीवरील माहितीचे

दस्तऐवजीकरण आणि विकास, प्रतिबंधात्मक यंत्रणा आणि शमन उपाय करण्यासाठी जबाबदार असेल.

(9) उप-कलम (8) मधील तरतुदींच्या व्यापकतेला जराही धक्का न लावता, राष्ट्रीय संस्था, तिच्या कार्यांच्या अंमलबजावणीसाठी-

(क) आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रशिक्षण मापांकांचा विकास, संशोधन आणि दस्तऐवजीकरण, तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करील;

(ख) आपत्ती व्यवस्थानाच्या सर्व पैलूंचा समावेश होईल अशी सर्वसमावेशक मानव संसाधन विकास योजना तयार करून ती कार्यान्वित करील;

(ग) राष्ट्रीय स्तरावरील धोरण निर्मितीसाठी मदत करील;

(घ) सरकारी पदाधिकाऱ्यांसहित इतर संबंधितांसाठी प्रशिक्षण आणि संशोधन कार्यक्रमांचा विकास करण्यासाठी प्रशिक्षण आणि संशोधन संस्थांना आवश्यक सहाय्य पुरविल आणि राज्य स्तरीय प्रशिक्षण संस्थांच्या शाखा सदस्यांना प्रशिक्षण देईल;

(ङ) राज्य स्तरीय धोरणे, रणनीती, आपत्ती व्यवस्थापन रचना तयार करण्यासाठी राज्य सरकार आणि राज्य प्रशिक्षण संस्थांना सहाय्य करील आणि इतर संबंधित, पदाधिकाऱ्यांसह सरकार, नागरी समाज सदस्य, उद्योग क्षेत्र आणि लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी इत्यादींच्या क्षमता बांधणीसाठी राज्य सरकार किंवा राज्य प्रशिक्षण संस्थांना आवश्यक असलेले सहाय्य प्रदान करील;

(च) आपत्ती व्यवस्थापनासाठी शैक्षणिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित शैक्षणिक साहित्याचा विकास करील;

(छ) बहू-आपत्ती शमन, सज्जता आणि प्रतिसादाच्या उपायांशी संबंधित महाविद्यालये किंवा शालेय शिक्षक आणि विद्यार्थी, तांत्रिकी कार्मिक आणि इतर संबंधितांमध्ये जागृतीला चालना देईल;

(ज) उपरोक्त बाबींचा प्रचार करण्यासाठी देशांतर्गत आणि देशाबाहेर अभ्यासक्रम, परिषदा, व्याख्याने, परिसंवादांचे उपक्रम राबविल व त्यांचे आयोजन आणि सुलभीकरण करील;

(झ) पत्रके, शोध निबंध आणि पुस्तकांच्या प्रकाशनाचे काम करील आणि त्यासाठी तरतूद करील आणि उपरोक्त बाबींना चालना देण्यासाठी वाचनालयांची स्थापना आणि त्यांची देखभाल करील;

(ञ) अशी इतर सर्व कायदेशीर कार्ये करील जी उपरोक्त उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक किंवा आनुषंगिक असतील; आणि

(ट) केंद्र सरकारने तिला नेमून दिलेली अशी कोणतीही इतर कार्ये हाती घेईल.

**(43) राष्ट्रीय संस्थेचे अधिकारी व इतर कर्मचारी-**

केंद्र सरकार राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेला तिची कार्ये पार पाडण्यासाठी तितके अधिकारी, सल्लागार आणि इतर कर्मचारी देईल जितके त्याला आवश्यक वाटेल.

**प्रकरण 8**

## राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल

**44. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल-**

(1) कोणतीही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीचा तज्ञांच्या प्रतिसादाद्वारे सामना करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना केली जाईल.

(2) या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करून, हे दल अशा रितीने तयार केले जाईल आणि या दलाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी ज्यांच्या अंतर्गत त्याच्यासाठी शिस्ती संबंधी असलेल्या तरतुदी, त्या असतील ज्या निर्धारित केल्या जातील.

**(45) नियंत्रण, निर्देशन इत्यादी-**

या दलाचे सामान्य अधिक्षण, निर्देशन आणि नियंत्रण राष्ट्रीय प्राधिकरणाकडे असेल आणि या दलाचा ताबा आणि पर्यवेक्षण केंद्र सरकारद्वारे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचा महासंचालक म्हणून नेमावयाच्या अधिकाऱ्याकडे असेल.

## प्रकरण 9

## वित्त, लेखा आणि लेखापरिक्षा

**46.** **राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी -**

(1) केंद्र सरकार, राजपत्रात अधिसूचना देऊन, आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीचा सक्षमपणे सामना करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी नामक निधीची स्थापना करील आणि ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल-

(क) अशी रक्कम जी केंद्र सरकार, संसदेद्वारे या कारणासाठी कायदेशीरपणे केलेल्या योग्य समायोजनानंतर, प्रदान करील;

(ख) एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने आपत्ती व्यवस्थापनाच्या कारणासाठी दिलेले कोणतेही अनुदान.

(2) केंद्र सरकारने राष्ट्रीय प्राधिकरणाशी सल्लामसलत करून निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून आपत्कालीन प्रतिसाद, बचाव आणि पुनर्वसन करण्यासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी राष्ट्रीय कार्यकारी समितिला राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी उपलब्ध करून दिला जाईल.

**47.** **राष्ट्रीय आपत्ती शमन निधी -**

(1) केंद्र सरकार, राजपत्रात अधिसूचनेद्वारे, केवळ आपत्तीच्या निवारणाच्या कारणासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी नामक निधीची स्थापना करील आणि त्यामध्ये अशी रक्कम जमा केली जाईल जी केंद्र सरकार, संसदेने या कामासाठी कायदेशीरपणे केलेल्या योग्य समायोजनानंतर, प्रदान करील.

(2) राष्ट्रीय प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीचे उपयोजन केले जाईल.

**48.** **राज्य सरकारद्वारे निधीची स्थापना-**

(1) राज्य सरकार, राज्य प्राधिकरण आणि जिल्हा प्राधिकरणांची स्थापना करण्यासाठी अधिसूचना जारी केल्यानंतर लगेच, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पुढील निधींची स्थापना करील, म्हणजेचः-

(क) राज्य आपत्ती प्रतिसाद निधी या नावाने ओळखला जाणारा निधी;

(ख) जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधी या नावाने ओळखला जाणारा निधी;

(ग) राज्य आपत्ती निवारण निधी या नावाने ओळखला जाणारा निधी;

(घ) जिल्हा आपत्ती निवारण निधी या नावाने ओळखला जाणारा निधी;

(2) राज्य सरकार हे सुनिश्चित करील की स्थापन केलेले निधी-

(i) उप-विभाग (1) च्या कलम (क) अंतर्गत राज्य कार्यकारी समितिसाठी उपलब्ध आहेत;

(ii) उप-विभाग (1) च्या कलम (ख) अंतर्गत राज्य प्राधिकरणासाठी उपलब्ध आहेत;

(iii) कलम (ख) आणि (ग) अंतर्गत जिल्हा प्राधिकरणासाठी उपलब्ध आहेत.

**49. मंत्रालये आणि खात्यांद्वारे निधी वाटप -**

(1) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग, आपल्या वार्षिक अर्थसंकल्पात, आपल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेमध्ये वर्णन केलेले क्रियाकलाप आणि कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी निधींची तरतूद करील;

(2) उप-कलम (1) च्या तरतुदी आवश्यक परिवर्तनासह राज्य सरकारच्या विभागांना लागू होतील.

**50. आपत्त्कालीन खरेदी व लेखा**

जिथे कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीमुळे, राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाची अशी खात्री होते की, बचाव किंवा सहाय्यासाठी रसद किंवा सामग्रीची तात्काळ खरेदी किंवा संसाधनांचा तात्काळ वापर आवश्यक आहे तिथे-

(क) ती संबंधित विभागाला किंवा प्राधिकरणाला आपत्कालीन खरेदी करण्याचे अधिकार प्रदान करील आणि अशा परिस्थितीत निविदा मागविण्याची प्रचलित मानक प्रक्रिया रद्द केली असे मानले जाईल;

(ख) यथास्थिती, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाने अधिकृत केलेल्या नियंत्रण अधिकाऱ्याने जारी केलेले रसद किंवा सामग्रीच्या वापरासंबंधीचे प्रमाणपत्र अशा रसदीच्या किंवा सामग्रीच्या आपत्कालीन खरेदीच्या लेखांकनासाठी ग्राह्य दस्तऐवज किंवा पावती मानली जाईल.

## प्रकरण 10

## गुन्हे व दंड

**51. अडथळा इत्यादींसाठी शिक्षा-**

जो कोणी वाजवी कारणाखेरीज-

(क) केंद्र सरकार किंवा राज्य सरकारचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी किंवा राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाने अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला या कायद्यानुसार ठरवलेली कार्ये पार पाडण्यास मज्जाव करीत असेल; किंवा

(ख) या अधिनियमा अंतर्गत केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समितिने किंवा त्यांच्या वतीने दिलेले कोणतेही निर्देश मानण्यास नकार देत असेल;

तो दोषी सिद्ध झाल्यास, त्याला एक वर्षापर्यंतचा कारवास किवा दंड, किंवा दोन्हींची शिक्षा होऊ शकते, आणि जर असा मज्जाव किंवा निर्देश पाळण्यास नकार दिल्यामुळे जीवितहानी किंवा संकटाची स्थिती उद्भवू शकते अशा स्थितीत तो दोषी सिद्ध झाल्यास दोन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते.

**52. खोट्या दाव्यासाठी शिक्षा-**

जो कोणी जाणूनबुजून केंद्र सरकार, राज्य सरकार, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून आपत्तीच्या परिणामस्वरूप नुकसान म्हणून बचाव, सहाय्य, पुनर्बांधणी किंवा इतर सुविधा प्राप्त करण्यासाठी असा दावा करील जो चुकीचा असल्याचे त्याला माहित आहे किंवा जो चुकीचा

आहे असे मानण्यास पुरेसे कारण आहे, त्याला दोषी सिद्ध झाल्यास दोन वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंड भरण्याचीही शिक्षा होऊ शकते.

**53. पैसे किंवा साहित्य इत्यादींचा गैरवापरासाठी शिक्षा-**

जो कोणी, कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीमध्ये मदत कार्यासाठी वापरण्यासाठी त्याच्याकडे सोपवलेले धन किंवा सामग्री, किंवा त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही धन किंवा सामग्री किंवा त्याच्या अधिपत्याखाली ठेवलेल्या धनाचा किंवा सामग्रीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा दुरूपयोग करील किंवा स्वतःच्या फायद्यासाठी उपयोग करील किंवा जाणूनबुजून इतर कोणत्याही व्यक्तीला तसे करण्यास परावृत्त करील, तो दोषी सिद्ध झाल्यास त्याला दोन वर्षांपर्यंतचा कारावास आणि दंड भरण्याचीही शिक्षा होऊ शकते.

**54. खोट्या चेतावणीसाठी शिक्षा-**

जो कोणी कोणतीही आपत्ती किंवा तिची गंभीरता किंवा तिच्या परिणामांसंबंधी भिती निर्माण करणारी चुकीची सूचना किंवा इशारा देतो, तो दोषी सिद्ध झाल्यास त्याला एका वर्षापर्यंतचा कारावास आणि दंड भरण्याचीही शिक्षा होऊ शकते.

**55. सरकारच्या खात्यांद्वारे गुन्हे-**

(1) जिथे या अधिनियमा अंतर्गत कोणत्याही सरकारी विभागाकडून गुन्हा झालेला असेल, तिथे अशा गुन्ह्यासाठी विभाग प्रमुखाला, तोपर्यंत दोषी मानण्यात येईल आणि त्याप्रमाणे तो आपल्याविरूद्ध कारवाई करण्यासाठी आणि दंड भोगण्यासाठी पात्र होईल, जोपर्यंत की तो सिद्ध करीत नाही की गुन्हा त्याच्या नकळत झाला आहे किंवा त्याने असा गुन्हा घडण्यापासून रोखण्यासाठी योग्य ती उपाययोजना केली होती;

(2) उप-विभाग (1) मध्ये कोणतीही बाब असून देखील, जिथे या अधिनियमा अंतर्गत कोणत्याही सरकारी विभागाकडून गुन्हा झालेला असेल आणि हे सिद्ध झाले असेल की तो गुन्हा विभाग प्रमुखाशिवाय इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याच्या अपरोक्ष किंवा तो गुन्हा कोणत्याही निष्काळजीपणामुळे झाल्याचे सिद्ध झाल्यास अशा अधिकाऱ्याला त्याबद्दल दोषी ठरविले जाईल आणि त्याप्रमाणे तो कारवाईस सामोरा जाण्यासाठी किंवा शिक्षा भोगण्यास पात्र ठरेल.

**56. कर्तव्यावर असणाऱ्या अधिकाऱ्याची असफलता किंवा या अधिनियमातील तरतुदींच्या उल्लंघनाकडे त्याचा कानाडोळा.**

असा कोणताही अधिकारी, ज्याच्याकडे या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमांतर्गत कोणतेही काम सोपवलेले असेल आणि जो ते करीत नसेल किंवा करण्यास नकार देत असेल किंवा स्वतःला अशा कामापासून दूर ठेवत असेल, असा अधिकारी, जोपर्यंत त्याने तसे करण्यासाठी आपल्या वरीष्ठ अधिकाऱ्याची लिखित परवानगी घेतली होती किंवा त्याच्याकडे तसे करण्यासाठी पुरेसे कायदेशीर कारण आहे हे सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्याला एक वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंड भरणे किंवा दोन्हींची शिक्षा होऊ शकते.

**57. अधिग्रहणाबाबत कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास दंडः**

जर कोणतीही व्यक्ती कलम 65 अंतर्गत दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करीत असेल तर अशी व्यक्ती एक वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंड भरणे किंवा दोन्हींच्या शिक्षेस पात्र होऊ शकते.

**58. कंपन्यांद्वारे गुन्हाः**

(1) जिथे या अधिनियमा अंतर्गत कोणतीही कंपनी किंवा व्यावसायिक मंडळाने कोणताही गुन्हा केला असेल तिथे, अशी प्रत्येक व्यक्ती जी गुन्हा घडण्याच्यावेळी कंपनीचा व्यवहार पाहण्यासाठी तिचा कारभार त्या व्यक्तीकडे होता आणि तो व्यवहार पाहण्याची तिच्यावर जबाबादारी होती त्या व्यक्तीला आणि त्याचबरोबर त्या कंपनीलाही अशा उल्लंघनासाठी दोषी ठरविण्यात येईल आणि त्यानुसार तिच्याविरूद्ध कारवाई करण्यासाठी किंवा शिक्षा भोगण्यास पात्र असेल.

पण, या उप-विभागाची कोणतीच बाब अशा कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमा अंतर्गत कोणत्याही दंडासाठी पात्र ठरविणार नाही जर ती व्यक्ती हे सिद्ध करू शकली की तो गुन्हा तिला माहिती न देता केला गेला होता किंवा असा गुन्हा घडू नये यासाठी तिने योग्य ती उपाययोजना केली होती.

(2) उप-विभाग (1) मध्ये कोणतीही बाब असून देखील, जिथे या अधिनियमा अंतर्गत कोणताही गुन्हा कोणत्याही कंपनीद्वारे केलेला आहे आणि हे सिद्ध होते की तो गुन्हा कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा दुर्लक्षामुळे झाला आहे किंवा तो गुन्हा कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडला असेल, तिथे असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकाऱ्यांनाही त्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात येईल आणि त्याप्रमाणे ते त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्यास आणि शिक्षा भोगण्यास पात्र ठरतील.

स्पष्टीकरण- या कलमाच्या उद्देशासाठी-

(क) “कंपनी” म्हणजे कोणतेही व्यावसायिक मंडळ आहे आणि त्यामध्ये एखादे आस्थापन किंवा इतर व्यक्तींच्या संघटनेचाही समावेश आहे; आणि
(ख) “संचालक” म्हणजे एखाद्या आस्थापनाचा भागीदार असे अभिप्रेत आहे.

**59. खटल्या (अभियोगा) साठी पूर्वमंजूरी-**

कलम 55 आणि 56 अंतर्गत दखलपात्र गुन्ह्यांसाठी, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा अशा सरकारद्वारे साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या कारणासाठी अधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजूरीशिवाय कोणताही अभियोग चालवला जाणार नाही.

**60. गुन्ह्यांची दखल-**

कोणतेही न्यायालय तोपर्यंत या अधिनियमा अंतर्गत कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही जोपर्यंत-

(क) यथास्थिती, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्राधिकरण किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी त्या प्राधिकरणाच्या किंवा सरकारच्या वतीने तक्रार करीत नाही; किंवा
(ख) अशी कोणतीही व्यक्ती, जिने तथाकथित गुन्ह्यासंदर्भात आणि तिच्या तक्रार करण्याच्या मनसुब्या संदर्भात राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्राधिकरण किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यासाठी विहित पद्धतीने कमीत कमी तीस दिवसांची सूचना दिली आहे.

## प्रकरण 11

## संकीर्ण

**61. भेदभावा विरोधात प्रतिषेध -**

आपत्तीमधील पिडीत व्यक्तींना नुकसान भरपाई देताना त्यांच्यामध्ये लिंग, जात, समुदाय, वंश किंवा धर्मानुसार कोणताच भेदभाव केला जाणार नाही.

**62. केंद्र सरकारद्वारे निर्देश जारी करण्याचा अधिकार -**

इतर कायद्यामध्ये काही काळासाठी काही लागू असले तरीही, केंद्र सरकारसाठी हे कायदेशीर असेल की त्याच्याद्वारे आपत्ती व्यवस्थापनाला सुलभ करण्यासाठी किंवा त्यामध्ये मदत करण्यासाठी भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग, किंवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य सरकार, राज्य प्राधिकरण, राज्य कार्यकारी समिती, वैधानिक संस्था किंवा त्यांचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांना, यथास्थिती, लेखी निर्देश देता येतील आणि अशी मंत्रालये किंवा विभाग किंवा सरकार, किंवा प्राधिकरणे, कार्यकारी समिती, वैधानिक संस्था, अधिकारी किंवा कर्मचारी त्या निर्देशांचे पालन करण्यास बांधील असतील.

**63. बचाव कार्यासाठी अधिकार उपलब्ध करणे-**

केंद्र किंवा राज्य सरकारचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, त्याला राष्ट्रीय कार्यकारी समिती, कोणतीही राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा कोणत्याही समितिने किंवा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीद्वारे विनंती केल्यास, आपत्ती प्रतिबंध किंवा निवारण किंवा बचाव किंवा मदत कार्यासाठी ती समिती किंवा प्राधिकरण किंवा व्यक्तीसाठी असे अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करील.

**64. विशिष्ट परिस्थितींत नियम बनविणे किंवा त्यात सुधारणा करणे-**

या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून जर, यथास्थिती, राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य कार्यकारी समिती, किंवा जिल्हा प्राधिकरणाला असे दिसून आले की, आपत्ती प्रतिबंध किंवा निवारणासाठी कोणतेही नियम, विनियम, अधिसूचना, मार्गदर्शक तत्वे, सूचना, आदेश, योजना किंवा उपविधी तयार करण्याची किंवा त्यांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, तर ते त्यासाठी यथास्थिती, नियम, विनियम, अधिसूचना, मार्गदर्शक तत्वे, सूचना, आदेश, योजना किंवा उपविधींमध्ये सुधारणा करण्याची अपेक्षा करतील आणि संबंधित विभाग किंवा प्राधिकरण त्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक कृती करतील.

**65. बचाव कार्यासाठी संसाधने, तरतुदी, वाहने इत्यादींच्या अधिग्रहणाचा अधिकार-**

(1) जर राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा त्याच्याद्वारे या कारणासाठी प्राधिकृत कोणत्याही अधिकाऱ्याला असे दिसून आले की-

(क) तात्काळ प्रतिसादासाठी कोणतेही प्राधिकरण किंवा व्यक्तीकडे असलेल्या संसाधनांची गरज आहे;

(ख) बचाव कार्यासाठी कोणत्याही जागेची गरज आहे किंवा गरज भासू शकते; किंवा

(ग) बचाव, पुनर्वसन किंवा पुनर्बांधणीसाठी आपत्तीग्रस्त क्षेत्रांतून संसाधनांची वाहतूक करण्यासाठी किंवा आपत्तीग्रस्त क्षेत्रांमध्ये संसाधनांची वाहतूक करण्यासाठी कोणत्याही वाहनाची गरज असेल किंवा गरज भासू शकेल,

अशा वेळी, असा प्राधिकारी लेखी आदेशाद्वारे, यथास्थिती, अशा संसाधनांची किंवा जागांची किंवा वाहनांची मागणी करील आणि अशा मागणीसंदर्भात त्याला आवश्यक किंवा योग्य वाटल्यास पुढे असे आदेश तयार करील.

(2) जेव्हा पोट-कलम (1) अंतर्गत कोणतेही संसाधन,जागा किंवा वाहनाची मागणी केली जाईल, तेव्हा अशा मागणीचा अवधी हा ज्या अवधीसाठी उप-कलमामध्ये दर्शविलेल्या उपयोगासाठी आवश्यक असलेल्या संसाधन, परिसर किंवा वाहनांची गरज असेल त्या अवधीच्या नंतरचा नसावा.

(3) या कलमामध्ये-

(क) “संसाधन” मध्ये मनुष्य आणि सामग्रीचा समावेश आहे;

(ख) “सेवा” मध्ये सुविधांचा समावेश आहे;

(ग) “जागा” म्हणजे कोणतीही जमीन, इमारत, किंवा इमारतीचा भाग आणि यामध्ये झोपडी, निवारा किंवा इतर संरचना किंवा तिचा भाग यांचाही समावेश होतो; आणि

(घ) “वाहन” म्हणजे वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले किंवा वापरण्यासाठी सक्षम असे कोणतेही वाहन जे तांत्रिक शक्ती किंवा इतर शक्तिने चालविले जाते.

**66. नुकसान भरपाईची रक्कम-**

(1) जेव्हा कलम 65 चे उपकलम (1) मध्ये निर्दिष्ट कोणतीही समिती, प्राधिकरण किंवा अधिकारी, त्या कलमाचे अनुसरण करताना कोणत्याही जागेची मागणी करतो तेव्हा त्या जागेशी हितबद्ध व्यक्तींना त्यासंबंधीची नुकसान भरपाई दिली जाईल ज्याची रक्कम खालील गोष्टी विचारात घेऊन निर्धारित केली जाईलः-

(i) जागेच्या संदर्भात भरायचे भाडे, किंवा असे कोणतेही भाडे भरायचे नसल्यास, त्या क्षेत्रातील तत्सम जागेसाठी भरायचे भाडे;

(ii) जर जागेच्या मागणीच्या पूर्ततेसाठी संबंधित व्यक्तीला आपले निवासस्थान किंवा धंद्याचे ठिकाण बदलावे लागले, तर अशा बदलासाठी लागणारा आनुषांगिक वाजवी खर्च (जर असल्यास).

(2) परंतु जेव्हा कोणतीही हितबद्ध व्यक्ती अशा ठरवलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेबाबत नाखूष असेल आणि हे प्रकरण हाताळण्यासाठी मध्यस्थ व्यक्तीची नेमणूक करण्यासाठी तीस दिवसांच्या आत, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्याकडे अर्ज करील, तेव्हा अशी नुकसान भरपाईची रक्कम ही केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारे नेमलेली मध्यस्थ व्यक्ती निर्धआरित करील ती असेलः

परंतु पुढे, जिथे नुकसान भरपाई मिळविण्याबाबतचे हक्क किंवा सदर रकमेच्या विभागणी संदर्भात कोणताही वाद असेल, अशावेळी सदर प्रकरण, वाद निवारणासाठी, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारे नेमलेल्या मध्यस्थाकडे संदर्भित केले जाईल, आणि त्या मध्यस्थाच्या निर्णयानुसार निर्धारित केले जाईल.

**स्पष्टीकरण-** या उप-कलमामध्ये, “हितबद्ध व्यक्ती” म्हणजे ती व्यक्ती जिच्या मूळ ताब्यात मागणीच्या आधी कलम 65 अंतर्गत मागणी केलेली जागा होती, किंवा जिथे कोणीही व्यक्ती ताबेदार नसेल तिथे, त्या जागेचा मूळ मालक.

(2) जेव्हा कलम 65 चे उपकलम(1) मध्ये सांगितलेली कोणतीही समिती, प्राधिकरण किंवा अधिकारी त्या कलमान्वये एखाद्या वाहनाची मागणी करतो, तेव्हा त्या वाहनाच्या मालकाला अशा वाहनांना भाडेपट्टीवर देण्यासाठी तेथील स्थानिक भाडे किंवा दरांच्या आधारावर केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने, यथास्थिती, ठरवलेल्या दराने नुकसान भरपाईची रक्कम दिली जाईल.

परंतु, जिथे अशा वाहनाचा मालक अशा ठरवलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेबाबत नाखूष असेल आणि हे प्रकरण हाताळण्यासाठी मध्यस्थ व्यक्तीची नेमणूक करण्यासाठी निर्धारित वेळेच्या आत, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्याकडे अर्ज

करतो, तेव्हा अशी नुकसान भरपाईची रक्कम ही केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारे त्यांच्या वतीने नेमलेल्या मध्यस्थ व्यक्तीद्वारे निर्धारित केलेली ती असेलः

परंतु पुढे, जिथे वाहन किंवा बोटीसाठी मागणी करण्याच्या नुकतेच अगोदर ते भाडेपट्टी कराराद्वारे मालकाशिवाय इतर व्यक्तीच्या ताब्यात असेल, अशावेळी या उप-कलमांतर्गत निर्धारित नुकसान भरपाईची एकूण रक्कम ती व्यक्ती आणि मालकामध्ये अशा रितीने विभागली जाईल ज्यामध्ये ते सहमत असतील, आणि कराराच्या व्यतीक्रमाच्या बाबतीत अशा रितीने विभागली जाईल जशी, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या वतीने नेमलेल्या मध्यस्थ व्यक्तीद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे असेल.

**67. चेतावणी इत्यादींच्या संप्रेषणासाठी प्रसार माध्यमांना निर्देश-**

राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा कोणतेही जिल्हा प्राधिकरण कोणताही प्राधिकारी किंवा श्राव्य किंवा दृक-श्राव्य माध्यमाशी संबंधित व्यक्ती किंवा संप्रेषणाच्या अशा साधनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीला, जी कोणत्याही आपत्तीची भितीदायक परिस्थिती किंवा आपत्तीच्या बाबतीत कोणताही इशारा किंवा सूचना देण्यासाठी उपलब्ध असेल, निर्देश देण्याची सरकारकडे शिफारस करील आणि संप्रेषणाची उपरोल्लेखित साधने आणि नेमलेली माध्यमे अशा निर्देशांचे पालन करण्यास बंधनकारक असतील.

**68. निर्णयाच्या आदेशांचे अधिप्रमाणन-**

राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य प्राधिकरण किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणाचा प्रत्येक आदेश किंवा निर्णयाचे, राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या अशा अधिकाऱ्यांद्वारे अधिप्रमाणित केले जाईल ज्यांना या कारणासाठी त्यांच्याद्वारे प्राधिकृत केलेले असेल.

**69. अधिकार सुपूर्द करणे-**

यथास्थिती, राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या सामान्य किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे अध्यक्ष किंवा इतर कोणत्याही सदस्याला किंवा कोणत्याही अधिकाऱ्याला अशा अटी आणि मर्यादांच्या, जर असल्यास, अधीन राहून जे आदेशामध्ये विनिर्दिष्ट करता येतील, या अधिनियमांच्या अधीन आपल्या अशा अधिकारांना आणि कृतींना, ज्या तिला गरजेच्या वाटतील, त्या प्रत्यायोजित करू शकेल.

**70. वार्षिक अहवाल-**

(1) राष्ट्रीय प्राधिकरण, प्रत्येक वर्षी, विहित नमुन्यामध्ये आणि वेळेत आपला वार्षिक अहवाल तयार करील, ज्यामध्ये मागील वर्षी केलेल्या आपल्या क्रियाकलापांचे बरोबर आणि संपूर्ण विवरण देईल आणि त्याच्या प्रती केंद्र सरकारला पाठविल आणि ते सरकार ते प्राप्त झाल्याच्या एका महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवील;

(2) राज्य प्राधिकरण, प्रत्येक वर्षी, विहित नमुन्यामध्ये आणि वेळेत आपला वार्षिक अहवाल तयार करील, ज्यामध्ये मागील वर्षी केलेल्या आपल्या क्रियाकलापांचे बरोबर आणि संपूर्ण विवरण देईल आणि त्याच्या प्रती राज्य सरकारला पाठविल आणि ते सरकार, जिथे त्या राज्यातील विधान मंडळामध्ये दोन सभागृहे आहेत, तिथे प्रत्येक सभागृहामध्ये आणि जिथे अशा विधान मंडळामध्ये एकच सभागृह आहे तिथे त्या सभागृहापुढे ठेवील.

**71. कोर्टाच्या अधिकारक्षेत्राला प्रतिबंध करणे-**

कोणत्याही न्यायालयाला(सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय सोडून) केंद्र सरकार, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य सरकार, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरणाद्वारे या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना किंवा त्या अंतर्गत कृत्यांच्या संबंधात केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई, केलेले आदेश, दिलेले निर्देश, सूचना किंवा मार्गदर्शक तत्वांसंबंधी कोणताही वाद किंवा कारवाई विचारात घेण्याचा अधिकार असणार नाही.

**72. अधिलिखीत प्रभावासाठी कायदा-**

या अधिनियमाच्या तरतूदी, त्यावेळी तयार केलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाहून वेगळ्या कोणत्याही कायद्याच्या आधारावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही दस्तऐवजामध्ये त्याच्याशी विसंगत कोणत्याही बाबीचा समावेश असून देखील, अंमलात असतील.

**73. प्रामाणिकपणे केलेली कारवाई-**

या अधिनियमाच्या किंवा त्या अंतर्गत नियम किंवा विनियमांतील तरतूदींच्या अंतर्गत केंद्र सरकार किंवा राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य सरकार किंवा राज्य प्राधिकरण

किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा स्थानिक प्राधिकारी किंवा केंद्र सरकार किंवा राष्ट्रीय प्राधिकरण किंवा राज्य सरकार किंवा राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण किंवा स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी किंवा असे सरकार किंवा प्राधिकरणासाठी कार्यरत कोणत्याही व्यक्तीद्वारे सद्भावनेने केलेले कोणतेही कार्य किंवा करण्याचा उद्देश असलेले किंवा करण्यासाठी आशयित कोणत्याही कार्याच्या बाबतीत असे प्राधिकरण किंवा सरकार, किंवा असा अधिकारी किंवा व्यक्तीच्या विरूद्ध कोणत्याही न्यायालयात वाद किंवा खटला किंवा अन्य कारवाई होणार नाही.

**74. कायदेशीर प्रक्रियेपासून सुरक्षितता-**

केंद्र सरकार, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य सरकार, राज्य प्राधिकरण, राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या शासकीय क्षमतेत त्यांच्याद्वारे संसूचित किंवा प्रसारित कोणत्याही नजीकच्या आपत्तीच्या बाबतीत, अशी संसूचना किंवा प्रसारणाच्या अनुषंगाने तिच्या द्वारे केलेली कारवाई किंवा जारी केलेल्या निर्देशांच्या बाबतीत कायदेशीर प्रक्रीयेपासून मुक्त राहतील.

**75. केंद्र सरकारचे नियम बनविण्याचे अधिकार-**

(1) केंद्र सरकार, या अधिनियमातील प्रयोजनांना कृतीशील करण्यासाठी राजपत्रामध्ये अधिसूचना देऊन नियम बनवू शकेल.

(2) विशिष्टतया आणि पूर्वगामी अधिकाराच्या व्यापकतेवर प्रतिकूल प्रभाव न पाडता, असे नियम खालील सर्व किंवा कोणत्याही विषयांसाठी तरतूदी करू शकतील, ते म्हणजेः-

(क) कलम 3 चे उपकलम (2) अंतर्गत राष्ट्रीय प्राधिकरणाची संरचना आणि सदस्यांची संख्या तसेच उपकलम (4) अंतर्गत राष्ट्रीय प्राधिकरणाच्या सदस्यांचा कार्यकाळ आणि सेवेच्या अटी;

(ख) कलम 7 चे उपकलम (2) अंतर्गत सल्लागार समितीच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते;

(ग) कलम 8 चे उपकलम (3) अंतर्गत राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या अध्यक्षाचे अधिकार आणि त्याची कार्ये त्याचप्रमाणे कलम 8 चे उपकलम (4) अंतर्गत राष्ट्रीय कार्यकारी समितीद्वारे आपल्या अधिकारांचा उपयोग आणि आपल्या कार्यांचे निर्वहन करण्यासाठी अवलंबण्यात येणारी प्रक्रिया;

(घ) कलम 9 चे उपकलम (3) अंतर्गत राष्ट्रीय कार्यकारी समितीद्वारे तयार केलेल्या उपसमितीशी संबंधित व्यक्तींना द्यावयाचे भत्ते;

(ङ) कलम 42 चे उपकलम (2) अंतर्गत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांची संख्या, उपकलम (3) अंतर्गत सदस्यांचा कार्यकाळ आणि त्यांची रिक्त जागा तसेच अशा रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया आणि उपकलम (4) अंतर्गत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या नियामक मंडळाची स्थापना करण्याची प्रक्रिया;

(च) कलम 44 चे उपकलम (2) अंतर्गत दलाची स्थापना करण्याची पद्धती, शिस्ती संबंधी तरतूदींसह दलाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी;

(छ) ती पद्धती जिच्यामध्ये कलम 60 च्या भाग (ख) अंतर्गत राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, केंद्र सरकार, राज्य सरकार किंवा प्राधिकारी किंवा अधिकारी यांना गुन्ह्याची कल्पना आणि तक्रार करण्याच्या विचाराची सूचना देण्यात येईल;

(ज) तो नमुना आणि तो अवधी ज्याच्यामध्ये कलम 70 अंतर्गत वार्षिक अहवाल तयार करायचा आहे;

(झ) अन्य कोणताही विषय जो निर्धारित केला जाईल किंवा केला जाऊ शकतो किंवा ज्याच्या संबंधात नियमांद्वारे तरतूदी करायच्या आहेत.

**76. विनियम बनविण्याचे अधिकार-**

(1) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, केंद्र सरकारच्या पूर्व-परवानगीने या अधिनियमाच्या प्रयोजनांना क्रियाशील करण्यासाठी, हा अधिनियम आणि त्या अंतर्गत बनवलेल्या नियमांच्या जोडीने राजपत्रात अधिसूचना देऊन विनियम तयार करू शकेल.

(2) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या व्यापकतेवर प्रतिकूल प्रभाव न घालता असे विनियम खालील सर्व किंवा कोणत्याही विषयांच्या संबंधात विनियम करू शकतील, ते म्हणजेः-

(क) नियामक मंडळाद्वारे वापरण्यात येणारे अधिकार आणि त्याच्या द्वारे अमलात आणली जाणारी कार्ये;

(ख) नियामक मंडळाद्वारे आपल्या अधिकारांचा वापर आणि आपली कार्ये अमलात आणण्यासाठी अंगीकारण्यात येणारी प्रक्रीया;

(ग) अन्य कोणताही विषय ज्याच्यासाठी या अधिनियमा अंतर्गत विनियमांद्वारे तरतूदी करता येतील.

**77. नियम आणि विनियम संसदेच्या सभागृहांसमोर ठेवणे-**

या अधिनियमा अंतर्गत केंद्र सरकारद्वारे तयार केलेला प्रत्येक नियम आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेद्वारे तयार केलेला प्रत्येक विनियम, तयार केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहा समोर, जेव्हा ते सत्रात असेल, एकूण तीस दिवसांच्या काळासाठी ठेवले जाईल. हा काळ एक किंवा दोन सत्रे किंवा लागोपाठच्या सत्रांमध्ये पूर्ण होऊ शकेल. जर त्या सत्रातील किंवा पूर्वीच्या लागोपाठच्या सत्रांच्या लगेच नंतरच्या सत्राच्या समाप्तीच्या आधी दोन्ही सभागृहे त्या नियम किंवा विनियमांमध्ये कोणताही बदल करण्यासाठी एकमत झाली किंवा दोन्ही सभागृहांचे या गोष्टीवर एकमत झाले की या नियमाचा विनियम बनवला जाऊ नये तेव्हा तो नियम किंवा विनियम केवळ, यथास्थिती, अशा बदललेल्या रूपातच प्रभावी होईल किंवा विलोपित होईल. परंतू, असा बदल किंवा विलोपन झाल्यामुळे तो नियम किंवा विनियमा अंतर्गत आधी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेवर कोणताही प्रतिकूल प्रभाव पडणार नाही.

**78. राज्य सरकारचे नियम बनविण्याचे अधिकार -**

(1) राज्य सरकार, या अधिनियमा अंतर्गत प्रयोजनांना पार पाडण्यासाठी राजपत्रात अधिसूचना देऊन नियम तयार करू शकेल.

(2) विशेषतः, आणि अगोदरच्या अधिकारांच्या व्यापकतेला बाध न आणता, असे नियम खालील सर्व किंवा कोणत्याही विषयांसाठी तरतूदी करू शकतील, ते म्हणजेः-

(क) कलम 14 चे उपकलम (2) अंतर्गत राज्य प्राधिकरणाची रचना आणि सदस्यांची संख्या तसेच त्याचे उप-कलम (5) अंतर्गत राज्य प्राधिकरणाच्या सदस्यांचा कार्यकाळ आणि सेवेच्या अटी;

(ख) कलम 17 चे उप-कलम (2) अंतर्गत सल्लागार समितिच्या सदस्यांना देण्याचे भत्ते;

(ग) कलम 20 चे उप-कलम (3) अंतर्गत राज्या कार्यकारी समितिच्या अध्यक्षांचे अधिकार आणि त्याची कामे तसेच कलम 20 चे उप-कलम (4) अंतर्गत राष्ट्रीय कार्यकारी समितिद्वारे आपल्या अधिकारांचा उपयोग आणि आपल्या कार्यांच्या अंमलबजावणीसाठी अनुसरण्यात येणारी प्रक्रिया;

(घ) कलम 21 चे उप-कलम (3) अंतर्गत राज्य कार्यकारी समितीद्वारे स्थापन केलेल्या उपसमितीशी संबंधित व्यक्तींना दिले जाणारे भत्ते;

(ङ) कलम 25 चे उप-कलम (2) अंतर्गत जिल्हा प्राधिकरणाची रचना आणि त्याच्या सदस्यांची संख्या तसेच कलम 25 चे उप-कलम (3) अंतर्गत जिल्हा प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याद्वारे वापरले जाणारे अधिकार आणि निर्वहन करण्याची कार्ये;

(च) कलम 28 चे उप-कलम (3) अंतर्गत तज्ञ म्हणून जिल्हा प्राधिकरणाद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही समितीशी संबंधित व्यक्तींना दिले जाणारे भत्ते;

(छ) अन्य कोणताही विषय जो विहित केला जायचा आहे किंवा केला जाऊ शकतो किंवा ज्यासंबंधी नियमांद्वारे तरतूद करायची आहे.

(3) या अधिनियमा अंतर्गत राज्य सरकारद्वारे तयार केलेला प्रत्येक नियम, तयार केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, जिथे ते दोन सभागृहांचे बनले आहे तिथे राज्य विधी-मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर, किंवा जिथे असे विधि-मंडळ एकाच सभागृहाचे आहे, तिथे त्या सभागृहासमोर ठेवला जाईल.

**79. अडचणींचे निवारण करण्याचे अधिकार-**

(1) जर या अधिनियमाच्या तरतूदींना प्रभावी करण्यासाठी कोणतीही अडचण निर्माण होत असेल तर, यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य सरकार, राजपत्रात अधिसूचना प्रकाशित करून, असा आदेश करील जो या अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत असणार नाही, आणि जो अडचणीला दूर करण्यासाठी आवश्यक किंवा उपयुक्त असेलः

पण, या अधिनियमाच्या सुरूवातीपासून दोन वर्षांच्या समाप्तीनंतर असा कोणताही आदेश केला जाणार नाही.

(2) या कलमा अंतर्गत केलेला प्रत्येक आदेश, तो तयार केल्यानंतर शक्य तितक्यआ लवकर, यथास्थिती, संसद किंवा विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवला जाईल.

----------------------